नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

29

कै. भाऊजी दफ्तरी स्मृती संदर्भ ग्रंथालय विदर्भ साहित्य संघ, नागपूर

या अंकांत

उपनिषदर्थव्याख्या	कै. डॉ. भाऊजी दफ्तरी
भारतीय नृत्याची पार्श्वभूमि	एम्. आर. देशपांडे
काठीरोड	कृ. आं. मुंगीकर
ग्रंथसमालोचन : कलचुरि–चेदि संवताचे कोरीव लेख	बालचंद्र जैन
नवरसामाझारि शृंगारसा	बळीराम येरकुंठवार
ग्रंथसमालोचन : हरिवरदा व ग्रामगीता	शं. गो. च. व म. ना. प.
पत्रव्यवहार	ग. त्र्यं. माडखोलकर

याशिवाय कविता, संघवार्ता वगैरे

तपासले
१९९६

११

संपादक :
दि. ब. पंडित

एप्रिल १९५६
किंमत आठ आणे

विदर्भ साहित्य संघ
विदर्भ विषय सारस्वती

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

[सं]घाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक :

श्री. दि. ब. पंडित

संपादक मंडळ :

ना. के. महाजन

श्री. तु. ना. काटकर

श्री. म. अ. चान्सरकर

श्री. मा. नी. गलगलीकर

श्री. रा. ना. घाटोळे

वर्ष १० वें अंक १२ वा

एप्रिल १९५६

संपादकीय

ह्या माझ्या संपादकीय कारकिर्दीतील शेवटचा आणि नवीन वर्षाचा प्रथमांक. आगामी वर्षाचें संपादकत्व ख्यातनाम साहित्यिक, संशोधक आणि रसिक श्री. पां. कृ. सावळापूरकर ह्यांचेकडे आहे. युगवाणीचें संपादकत्व स्वीकारायला ते माझ्यापेक्षा अधिक समर्थ आहेत. ही प्रशस्ति मीं त्यांना द्यायला हवी असें नाही. पण वर्षभर माझ्या मगदुराप्रमाणे माझ्या सहकारी संपादकांच्या साहाय्याने 'युगवाणी' चालविल्यामुळे तिच्याबद्दल मला आणि माझ्या सहकाऱ्यांना सहवासजनित जिव्हाळा वाटू लागल्यास नवल नाही. आपली जिव्हाळ्याची वस्तु समर्थाहातीं सुखरूप राहील अशी खात्री वाटल्यावर मनाला येणारी निश्चिंतता बोलून दाखविल्याशिवाय माझ्याने राहावत नाही म्हणून वरपांगी औपचारिक वाटणारा ह्या प्रकार मला करावा लागला. वस्तुतः 'युगवाणी' ह्यापूर्वीच त्यांच्या हातीं जायला हवी होती. पण परीक्षा समितीच्या अत्यंत जिकिरीच्या नेतृत्वासाठी त्यांची अधिक आवश्यकता असल्यामुळे 'युगवाणी'चें संपादकत्व त्यांच्याकडे देणें उचित नव्हतें. आता परीक्षासमितीचें नेतृत्व श्री मा. के. बैतुले ह्यांच्याकडे गेल्यामुळे श्री. सावळापूरकर 'युगवाणी'-साठी लाभले. ह्याबद्दल माझ्याप्रमाणेच 'युगवाणी'च्या अन्य चहात्यांनाहि आनंद झाल्यावाचून राहणार नाही अशी माझी खात्री आहे.

माझ्या संपादकीय कार्यकालांत 'युगवाणी'ला जें स्वरूप यावें अशी माझी इच्छा होती, तसें स्वरूप मी पूर्णतः आणूं शकलों नाही. ह्यांत आलेल्या अडचणींचा पोवाडा वाचण्यांत अर्थ नाही. कारण मुख्य अडचण माझ्या मगदुराची होती. माझ्या सहकाऱ्यांनी आपल्यापरी मला साहाय्य करूनहि ह्या न्यूनतेची भरपायी होऊं शकली नाही, हें पाहिलें म्हणजे मी माझ्या लघुत्वाच्या जाणीवेने फारच खंतावतों; पण त्याला इलाज नाही. अल्प सामर्थ्याच्या माणसाने मोठी इच्छा धरली की त्याच्या वाटणीला खंती यावयाचीच. निव्वळ इच्छांच्या वारूंवर आरूढ होतां येते तर भिकारीहि स्वार बनते ह्या इंग्रजी म्हणींतील व्याजोक्ति अशा वेळीं खटकन् जाणवते.

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

ही जाणीव असल्यामुळेच इतर अडचणींची सबब मनांत उद्भवतच नाही. इतर अडचणी असल्या तरी त्यांचा परिहार अशक्यप्राय थोडाच असणार आहे ? पण अल्पशक्ति माणसाने अगोदर शक्तीची प्रार्थना करावी मग इतर अडचणींच्या परिहाराचा विचार. मला समाधान एवढेंच की ही जाणीव मला अगोदरपासूनच असल्यामुळे व मी तशी कबुली पहिल्याच अंकीं दिली असल्यामुळे आज गेल्या वर्षाचें सिंहावलोकन करतेवेळीं, आपण आढचता मिरवली ती निरर्थक होती, ह्याची कबुली देण्याची लाजिरवाणी पाळी माझ्यावर आलेली नाही.

सिंहावलोकनाचा प्रश्न आला म्हणजे गेल्या वर्षी ज्यांनी आम्हाला साहाय्य केलें त्यांची स्मृति जागृत होते. कांहींनी प्रत्यक्ष साहाय्य केलें, कांहींनी अप्रत्यक्ष. कै. डॉ. भाऊजींनी लेखमाला देऊन मला उपकृत करून ठेवले. त्या भाराचे भारत्वच त्यांच्या उदार वात्सल्याने मला भासूं दिलें नाही. इतर लेखकांचीहि अशीच रीति. त्यांनी मला लेखन साहाय्य करून युगवाणी सजवायला माझें निमित्त करावें आणि त्यांचा लेख मुद्रांकित झाला की त्यांच्या विचारांचें वहन मीं केलें म्हणून त्यांनीच मला धन्यवाद द्यावेत असें त्यांचें सौजन्य. कांहींनी युगवाणीच्या स्वरूपाबद्दल माझें अभिनंदन करावें व मला प्रोत्साहित करावें. माझ्या सहकाऱ्यांबद्दल मी काय लिहूं ? संपादकमंडळ नाममात्र अनेकांचें मिळून, पण तें इतकें मिळून गेलेलें की कष्टभार स्वीकारण्यांत सर्वस्वी एकरूप. त्यांचे मी आभार मानणार नाही. आभार मानायचें की द्वित्वाचा अंगीकार करावा लागणार. ह्याला माझें मन राजी होत नाही. आणि तसें मी चंद्रबळ आणलेंच तर ते माझ्यावर नाराज होतील.

माझ्या पूर्वकृत संकल्पाप्रमाणें हा अंक हस्तलिखित विशेषांक काढायचा विचार होता. ही कल्पना माझ्या सहकाऱ्यांचीच. कार्यभारहि त्यांनीच स्वीकारला. आम्ही तशी योजनाहि आखली. हस्तलिखितांबद्दल आम्हाला सकौतुक प्रेम आहे. कांही हस्तलिखितें पाहून मन असें प्रसन्न होतें की कांही पुसूं नका. त्यांतील लेखनाची यत्ता विविध असली तरी प्रसिद्धींचा हपाप न बाळगतां केवळ सर्जनशील वृत्ति बळावली म्हणूनच ज्यांनी हातीं लेखणी धरली त्यांच्या लेखनांत सहजतेचें सौंदर्य आपोआपच उमटतें. त्यांच्या कल्पना वेड्या असतील, विचार अपक्व असतील, रचना शिथिल असेल, त्यांत हजार दोष असतील. पण त्यांत एक प्रकारची निरागसता असते, मनाची मोकळीक असते, सहकार्याची प्रचीति असते, प्रयत्नाची प्रार्थना असते, अभ्युदयाची श्रद्धा असते, आत्माविष्काराचं सहजता असते. तेथे साहित्याचा खरा आढळ होतो. तेथे नांवाची पूजा नाही, अहंकाराला अधिष्ठान नाही आढयतेखोरीचा दर्प नाही, दंभाची कुबट वस्ती नाही.

ह्या मोकळ्या साहित्याचा जिवंत श्वास शिश्याच्या टैपाच्या निर्जिव आश्रयाने चिरंजीव होऊं पाहणाऱ्या आणि पोस्टाच्या तिकिटाच्या मोलाने घरोघर पांगून सर्वव्यापी होऊं पाहणाऱ्या साहित्याच्या प्रांगणांत आणून सोडावा असा आमचा विचार होता. साहित्याची कूस विपुलप्रसू असल्यामुळे हा नवा उपद्व्याप कशाला हा प्रश्न येथे निरर्थक होय. माझ्या ह्या लिहिण्याचा पुष्कळांना विमर्श वाटेल, ह्याची मला जाणीव आहे पण त्याला माझा इलाज नाही. आत्मरूप प्रगटीकरणाची वेदना झाली की साहित्याचा अवतार होतो, ह्यांपैकी फारच अल्प साहित्याला अवतारकार्य असल्यामुळे बहुतेक साहित्याला जन्मतःच कालगंगेंत मोक्ष मिळून त्याचा अवतार संपतो. हें वसुवर्गीय साहित्य अगोदरच भाराक्रान्त असलेल्या ह्या दीन जगाला आपल्या भारांतून मोकळें करीत असल्यामुळे नवागताला येथे नित्य भरपूर जागा असते. तेव्हा हस्तलिखितांतील कांही साहित्य टैपाच्या आणि तिकिटांच्या आधारें एक महिन्याच्या अल्पावधीसाठी सोळाशें सभासदांघरीं फैलावून द्यायला हरकत नाही असा आमचा विचार होता.

असें असूनहि आम्ही तो बेत रद्द केला आहे. कारण आमच्या व्यावहारिक अनभिज्ञतेची अडचण आमच्यापुढे उभी आहे. एप्रिल महिन्याच्या अंकाचें देयक १९५६–५७ या आर्थिक वर्षी लागूं होत असल्याने खर्च करावा आम्ही आणि वारावें पुढच्या संपादकांनी असा येथे व्यवहार आहे. हा व्यवहार

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असूनहि आमच्या ध्यानीं आला नाही. ६ च्या युगवाणीच्या शिल्कींतून नवीन खर्च येत नाही. आणि खास अंकाच्या अतिरिक्त भार आगामी वर्षावर ढकलायला मन धजत ्हणून तो बेत आम्हाला रद्द करावा लागत वर क्षमायाचनेशिवाय उपाय कोणता ?

ा फक्त एकच गोष्ट. आमच्या संपादकीयावर माडखोलकर यांनी एक खुलासा पाठविला अन्यत्र छापला आहे. तो वाचकांनी कृपा करून म्हणजे आमच्या संपादकीयाने जर कोणाचा ाला असेल तर तो दूर करून घेतां येईल.

या वर्षी संपादन माझ्यावर सोपविण्यांत गीने जो विश्वास दाखविला, त्याबद्दल मी ह्या विश्वासाला हादरा बसूं नये म्हणून स मी संपादकीय लिहीतच नसें. संपादकाने लिहिलेंच पाहिजे ह्या दृढमूल समजामुळे वें लागलें. रूढीला माणूस वळी पडतो तो ोचा प्रतिकार मी टिकवून ठेऊं शकलों नाही. युगवाणीचें संपादकीय मी लिहूं लागलों. वि. सा संघाचें हें 'मुखपत्र.' आपल्या तोंडाने आपला अपराध मान्य करावा हें मला उचित वाटलें म्हणून विदर्भ साहित्य-संघाचा अपराध मी गेल्या अंकीं सविस्तर मान्य केला. व त्या अपराधाची मीमांसा केली. मुखपत्र म्हणजे वकीलपत्र नव्हे. एवढी गोष्ट आपण ध्यानीं धरावी. इतकें असूनहि जर कोणाचा रोष असेलच तो मलाच नव्हे तर साऱ्या संपादक मंडळाला सुपह्य आहे. ज्या वि. सा. संघांत मुख्यमंत्र्यांच्या प्रीतीने त्याचा जन्म-दिनोत्सव घडवून आणला त्या संघाच्या कार्यकारिणीने बैठक होऊनहि डॉ. दप्तरींच्या मृत्यूच्या दुखवटयाचा फुकाचा ठरावहि केलेला नाही, ही गोष्ट मात्र खरी. मुख्यमंत्र्यांच्या प्रीतीची प्रेरणा कोठें, कशी व का उद्भवली आणि डॉ. दप्तरींच्या मृत्युबाबत ही स्थित-प्रज्ञता कशी लाभली हें कार्यकारिणीचा सदस्य असले-ल्या संपादकाला अजूनहि कळलें नाही व आता तो सदस्य नसल्याने त्याला कळायची आवश्यकताहि नाही.

विदर्भ साहित्य संघाचीं प्रकाशनें

१. निबंध परिमल	(निवडक मौलिक निबंधांचा संग्रह)	रु. २-४-०
२. सुमन संचय	(कविता संग्रह)	रु. १-४-०
३. मराठी गद्य	(मराठी साहित्यांतील निवडक वेचे)	रु. १-८-०
४. अंमलदार	(नाटक) लेखक-श्री पु. ल. देशपांडे	रु. २-०-०
५. भारती	(नाटक) लेखक-श्री नाना जोग	रु. १-८-०
६. हिंदी मराठी भाषा प्रवेशिका	लेखिका-श्रीमती मालतीबाई श्रीखंडे	रु. ०-१२-०

कै. राम गणेश गडकऱ्यांच्या साहित्यावरील अभ्यासपूर्ण प्रबंध

वाग्वैजयंतीचें पुनर्मूल्यन	--डॉ. मा. गो. देशमुख	रु. ०-६-०
नाटककार गडकरी	--श्री द. रा. गोमकाळे	रु. ०-६-०
गोविंदाग्रज यांचा कवि या नात्याने विचार	--कविभूषण अण्णासाहेब खापर्डे	रु. ०-८-०
४. गडकऱ्यांच्या नाटकांतील स्वगत	--प्रा. श्री. मा. कुळकर्णी	रु. ०-८-०

चिटणीस, विदर्भ साहित्य संघ, केन्द्रीय कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मुंडकोपनिषद्

डॉ. के. ल. उर्फ भाऊजी दफ्तरी

हें छंदोबद्ध असल्यामुळे भगवद्गीतेच्या पूर्वीचें ठरतें. कठांतील कांहीं श्लोक ह्यांत आहेत. कठ २।२३।२४=मुंडक ३।२।३-४; कठ २।५=मुंडक १।२।८; कठ ५।१५=मुंडक २।२।१०. ह्यावरून कठ पाहून नंतर मुंडक लिहिलें गेलें किंवा मुंडक पाहून कठ लिहिलें गेलें असे दोनहि प्रकारचे सिद्धांत होऊं शकतात. निश्चित अमकाच सिद्धांत असें म्हणतां येत नाही. तथापि मुंडक ३।२।६ येथील "वेदांत" शब्दावरून मुंडका-पूर्वी वरींच उपनिषदें म्हणजे "केन" "कठ" आणि "प्रश्न" हीं होऊन गेलीं होतीं असें दिसतें. मुंडक १।२।१ येथे त्रेतायुगाचा निर्देश भूतकालीन असा आहे. त्यावरून हें द्वापरयुगांत म्हणजे भारतीय युद्धापूर्वी म्हणजे इ. स. पूर्व १४०२ ते इ. स. पूर्व १२०२ ह्या काळांत झालें असेल. ह्याचा कर्ता अंगिराः ऋषि असावा.

घटनेची योजना—ह्याचीं तीन मुंडकें असून प्रत्येकाचे दोन खंड आहेत. मुं. १ खंड १ ह्यांत प्रस्तावना व जगाची उत्पत्ति सांगितली आहे. मुं. १ खं. २ ह्यांत यज्ञकर्मवाद्यांचा पूर्वपक्ष व त्याचें खंडन आहे आणि शेवटीं यज्ञकर्माचें वैयर्थ्य जाणून ब्रह्मविद्येकरितां गुरूस शरण जावें असें सांगितलें आहे. मुंडक २ खंड १ ह्यांत जगाची उत्पत्ति सविस्तर सांगून अनाविष्कृत ब्रह्माचें वर्णन केलें आहे. मुंडक २ खंड २ ह्यांत व पुढे आविष्कृत ब्रह्माचें म्हणजे जीवाचें वर्णन करून, अनाविष्कृत व आविष्कृत ब्रह्मामधील म्हणजे ईश्वर व जीव ह्यांमधील फरक स्पष्ट केला आहे आणि जीवास ईश्वराचें ज्ञान झाल्याने तो ईश्वराशीं परमसाम्य पावतो व मरणकाळीं जन्ममृत्यूच्या फेऱ्यांतून मुक्त होऊन ब्रह्मांत मिळून जातो असें सांगितलें आहे.

मुंडक १ खंड १

मुंडक १ खंड १ श्लोक १-३

ब्रह्मा देवानां प्रथमः संबभूव।
विश्वस्य कर्ता भुवनस्य गोप्ता ॥
सब्रह्मविद्यां सर्वविद्याप्रतिष्ठाम्।
अथर्वाय ज्येष्ठपुत्राय प्राह ॥१॥
अथर्वणे यां प्रवदेत ब्रह्माऽ।
थर्वा तां पुरोवाचांगिरे ब्रह्मविद्यां ॥
स भारद्वाजाय सत्यवाहाय प्राह।
भारद्वाजोंगिरसेपरावराम् ॥१॥
शौनकोह महाशालोंऽगिरसं विधिवदुपसन्नः पप्रच्छ।
कस्मिन्नु भगवो विज्ञाते सर्वमिदं विज्ञातम् भवति
इति ॥३॥

अर्थ—देवांमध्ये म्हणजे अधिकाऱ्यांमध्ये ब्रह्मा (आनंद नांवाचा ब्रह्मा) पहिला होऊन गेला तो विश्वाचा म्हणजे समाजाचा कर्ता म्हणजे समाजाची रचना करणारा व भुवनाचा म्हणजेच समाजाचा रक्षण करणारा होता. त्याने सर्व विद्यांना आधारभूत असलेली ब्रह्मविद्या आपल्या अथर्वा नांवाच्या ज्येष्ठ-पुत्रास सांगितली. ॥१॥ ब्रह्म्याने अथर्व्याला जी विद्या सांगितली ती पूर्वी अथर्व्याने अंगिऱ्यास सांगितली. अंगिऱ्यानें सत्यवाह भारद्वाजास सांगितली, त्या भरद्वाजाने पूर्वीच्या लोकांपासून अलीकडच्या लोकांस प्राप्त होत गेलेली ती विद्या [परावरां] अंगिरसास सांगितली. ॥२॥ मोठ्या विद्यालयांत शिकलेला [महाशालः] शौनक योग्यविधीने [विधिवत्] अंगिरसाकडे आला आणि

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्याला पुसता झाला, "हे भगवन्, काय जाणलें असतां हें सर्व जाणलें जातें ॥३॥

टिप्पणी:—वाराहकल्पाच्या आरंभीं म्हणजे इ. स. पूर्व ३१०२ किंवा शकपूर्व- ३१८० ह्या काळीं आनंद नांवाच्या ऋषीने ब्रह्मर्षिदेशांत स्वतः ब्रह्मपद धारण करून राज्य स्थापिलें, व नवीन समाजव्यवस्था, यज्ञव्यवस्था, कालगणनापद्धती, विवाहपद्धती व धर्मव्यवस्था स्थापन केली (Artronomical method etc. छेदक ३५५, ३५६, २९८, २९९) म्हणून त्याला येथें "देवानां प्रथमः" "विश्वस्य कर्ता" आणि "भुवनस्य गोप्ता" असें म्हटलें आहे. "परावराम्" "पर" म्हणजे पूर्वीचे लोक आणि 'अवर' म्हणजे अलीकडे लोक म्हणून 'परावर' ह्याचा अर्थ पूर्वीच्या लोकापासून अलीकडच्या लोकास प्राप्त झालेली असा केला आहे. श्री. शंकराचार्यांनीहि असाच अर्थ केला आहे.

मुंडक १ खंड १ श्लोक ४-६

तस्मै स होवाच । द्वे विद्ये वेदितव्ये इति ह
स्म यद् ब्रह्मविदो वदंति पराचैवापरा च ॥४॥
तत्रापरा ऋग्वेदो यजुर्वेदः समार्वेदोथर्ववेदः
शिक्षा कल्पो व्याकरणं निरुक्तं छंदो ज्योतिषमिति
अथ परा यया तदक्षरमधिगम्यते ॥५॥
यत्तदद्रेश्यमग्राह्यमगोत्रमवर्णमचक्षुः क्षोत्रं
तदपाणिपादम् । नित्यं विभुं सर्वगतम् सुसूक्ष्मं ।
तद व्ययं यद् भूतयोनिं परिपश्यंति धीराः ॥६॥

अर्थ—त्या शौनकाला अंगिरस म्हणता झाला. ब्रह्मवत्ते जें सांगतात तें हें की परा आणि अपरा अशा दोन विद्या जाणण्याला योग्य [वेदितव्ये] अशा आहेत. ॥४॥ त्यांपैकी [तत्र] ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, आणि अथर्ववेद हे चार वेद आणि शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंदस् आणि ज्योतिष हीं सहा वेदांगे ही अपरा म्हणजे कमी महत्वाची विद्या होय. जिने तें अक्षर ब्रह्म जाणलें जातें ती परा म्हणजे श्रेष्ठ विद्या होय. ॥५॥ जें कोणत्याहि ज्ञानेंद्रियाला जाणतां येत नाही [अद्रेश्यं = अदृश्यम्], ज्याला हाताने पकडतां येत नाही [अग्राह्यम्], जें दुसऱ्या कशापासून उत्पन्न झालें नाही [अगोत्रं], ज्याला कोणताच रंग नाही [अवर्णं], ज्याला डोळे, कान, हात व पाय नाहीत असें, तें अक्षर आहे. तथापि तें नेहमी राहणारें [नित्यम्] सर्वांना आपल्या कह्यांत ठेवणारें [विभु], सर्व ठिकाणीं असणारें आणि सुसूक्ष्म आहे ॥ तें सर्वभूतांचें उत्पत्तिस्थान [योनि] असूनहि अव्यय म्हणजे क्षीण न होणारे आहे; म्हणजे त्यांतून कितीहि भूतें उत्पन्न झाली तरी तें कमी होत नाही व तेवढेंच कायम राहतें. अशा त्या भूतयोनीला शहाणे लोक [धीराः] पाहतात ॥६॥.

टिप्पणी—'अग्राह्य' ह्याचा ज्ञानेंद्रियांना म्हणजे डोळे, कान, घ्राण, रसना, व त्वचा ह्यांना अग्राह्य असा अर्थ होईल. (बुद्धीलाहि अग्राह्य असा अर्थ करू नये कारण "परिपश्यंति धीराः" असें येथेच स्पष्ट म्हटलें आहे. कठांतहि "दृश्यते सूक्ष्मया बुद्ध्या" (३।१२) असें स्पष्ट म्हटलें आहे.) तथापि "अद्रेश्य" व "अग्राह्य" ह्यांचा एकच अर्थ करणें बरोबर नाही म्हणून "अग्राह्य" ह्याचा अर्थ "जें हाताने पकडतां येत नाही तें" असा करावा.

अगोत्रंः—ज्याला गोत्र नाही तें. म्हणजेच जें दुसऱ्या कोणापासून उत्पन्न झालें नाही तें.

अवर्णम्ः—गुणरहित असल्यामुळे ज्याचें वर्णन करतां येत नाही तें असा अर्थ कोणी करतील. ब्रह्म अगदीच अवर्णनीय आहे असें नाही म्हणून तो अर्थ बरोबर नाही. रंगरहित असा अर्थ करावा; त्यास कोणतीच हरकत नाही. श्री शंकराचार्यांनी अनेक अर्थ केले त्यांपैकी तो एक आहे.

अव्ययः--ज्यांतून कितीहि भूतें उत्पन्न होऊन बाहेर निघालीं तरी जें जेवढेंचे तेवढेंच कायम राहतें, क्षीण होत नाही तें. असेच वर्णन "अदःपूर्णमिदंपूर्णं इत्यादि (बृहदारण्यक ५।१) येथे आहे. ह्याचें आणि बृहदारण्यक ३।८।८ ह्याचेहि विवरण पहा.

मुंडक १ खंड १ श्लोक ७-९

यथोर्णनाभिः सृजते गृह्णते च ।
यथा पृथिव्यामोषधयः संभवंति ॥
यथा सतः पुरुषात्केशलोमानि ।
तथाऽक्षरात्संभवतीह विश्वम् ॥७॥

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तपसा चीयते ब्रह्म ततोऽन्नमभिजायते ।
अन्नात्प्राणोमनः सत्यम् लोकाः कर्मसुचामृतम् ॥८॥
यः सर्वज्ञः सर्वविद्यस्य ज्ञानमयं तपः ।
तस्मादेतद्ब्रह्मनाम रूपमन्नं च जायते ॥९॥

अर्थ:—ज्याप्रमाणे कोळी स्वतःच्या शरीरांतून स्वताच तंतूचें जाळें निर्माण करतो आणि तें पुनः आंत घेतो, ज्याप्रमाणे पृथिवीवर औषधि उत्पन्न होतात आणि ज्याप्रमाणे जिवंत असलेल्या [सतः] पुरुषापासून मस्तकाचे केश [केश] आणि इतर भागावरील केश [लोमानि] उत्पन्न होतात त्याप्रमाणेच अक्षरापासून हें विश्व उत्पन्न होतें. म्हणजे ब्रह्म हें जगाचें उपादान कारण व निमित्त कारणहि आहे आणि ब्रह्माचा विकास होऊन जग बनलें, (ब्रह्माच्या ठिकाणीं आभास होऊन विश्व बनले असें नाही) असा भाव आहे. ॥७॥ तपांने ब्रह्म वाढतें [चीयते] तेव्हा त्यापासून अन्न म्हणजे पृथ्वी, पाणी, तेज, वायु व आकाश हीं पंच महाभूतें उत्पन्न होतात. त्या अन्नापासून "प्राण" म्हणजेच "जीवशक्ति" उत्पन्न होते. व "प्राणा" पासूनच सत्य म्हणजे ज्यांत ज्ञाता, ज्ञान आणि ज्ञेय ही त्रिपुटी आहे असें मन उत्पन्न होतें. मन असलेले अनेक प्राणी एकत्र आले असतां समाज [लोकाः] उत्पन्न होतात. समाजांत अनेक प्रकारचीं सत्कर्में उत्पन्न होतात व त्यापासून आनंद [अमृत] उत्पन्न होतो. ह्या आनंदाच्या प्राप्तीकरतांच ब्रह्म वाढतें म्हणजेच विकास पावतें आणि दुष्कर्मांपासून दुःख उत्पन्न होतें असे दोनहि भाव ह्या वाक्यांत आहेत. ॥८॥ जो सर्वज्ञ आहे आणि जो सर्व मिळविणारा आहे [सर्वविद्] इच्छा [ज्ञानमय] हीच ज्याचें तप आहे, त्या (अनाविष्कृत) ब्रह्मापासून (आविष्कृत) ब्रह्म नांवाचें, जें रूपहि आहे आणि अन्नहि आहे तें म्हणजे पंचमहाभूतें उत्पन्न झालीं. (पंचमहाभूतें ह्यांना रूप आहे आणि हीं प्रत्यक्षपणे स्थावर जीवांचें म्हणजे औषधीचें आणि अप्रत्यक्षपणे जंगम जीवांचें अन्न आहे हें प्रसिद्धच आहे) ॥९॥

टिप्पणी—तपः—म्हणजेच एकसारखी दीर्घकाळ पर्यंत केलेली इच्छा. अशा इच्छेंत निर्माणशक्ति (will-Power) असते हे अनुभवसिद्ध आहेच. मानसोपचारशास्त्र (Psychotherapy) हें ह्या शक्तीवरच अवलंबून आहे. मनाशिवाय इच्छा किंवा ज्ञान संभवत नाही आणि मन तर अन्न व प्राण ह्यानंतर उत्पन्न झाले आणि ब्रह्मास पुढे २।१।२ येथे "अमनाः" असें म्हटलेंहि आहे. म्हणून येथील "तपः" आणि "सर्वज्ञ" हे शब्द गौणार्थाने योजिले आहेत असें मानलें पाहिजे. गौणार्थाने तरी ते शब्द ब्रह्मास लावण्याचें कारण असें आहे की ब्रह्माच्या ठिकाणीं सर्वज्ञत्व आणि इच्छा आहेत असें मानल्याशिवाय जगाच्या रचनेची उपपत्ति लागत नाही. ("रचनानुपपत्तेश्च" हें व्याससूत्र पाहा.)

"अन्न"—चराचर प्राण्यांचें जें प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष अन्न आहे तें म्हणजे वायु, पाणी आणि पृथ्वी (माती व तीमधील क्षार); जुन्या मताप्रमाणे पंचमहाभूतें.

"अन्नात्प्राणः मनः सत्यम्"—अन्नापासून चराचर जीवांमध्ये असणारा प्राण आणि त्या प्राणापासूनच मन म्हणजे अहंकार, द्वैतज्ञान, बुद्धि वगैरे उत्पन्न झाले, हा अर्थ निर्विवादच आहे आणि प्रत्यक्ष जें दिसतें त्याशीं जुळणाराच आहे. मनापासून सत्य म्हणजे आकाशादि पंचमहाभूतें झालीं असा अर्थ कोणी—श्री शंकराचार्यहि करतात तो चूक आहे. कारण अन्न म्हणजे पंचमहाभूतेंच व त्यांची उत्पत्ति मागेच सांगितली आहे. म्हणून "सत्य" हें मनाचें विशेषण मानून "सत्य" म्हणजे "द्रष्टा, दर्शन आणि दृश्यवस्तु" ही त्रिपुटी ज्यांत आहे तें मन असा अर्थ करावा. तैत्तिरीय उपनिषदांत ब्रह्मानंद वल्ली ६ येथे "सत्या"चा हाच अर्थ आहे.

"सर्वविद्"—"सर्वज्ञ" आणि "सर्वविद्" ह्यांचा बहुतेक सारखाच अर्थ श्रीशंकराचार्यांनीहि केला आहे. पण "सर्वविद्" ह्यांतील धातू "वेत्ति" मानण्याऐवजी "विंदते" मानली तर त्या दोघांचा निरनिराळा अर्थ करतां येतो, सर्व मिळविणारा म्हणजे सर्व मिळविण्याची ज्यांत शक्ति आहे तो.

"ज्ञानमय" म्हणजे "इच्छामय" असा अर्थ घ्यावा; कारण तपः हें इच्छामयच असतें. इच्छाही ज्ञानात्मक असतेच.

"कर्मसुचामृतम्"—जीवांनी केलेल्या कर्मांत् म्हणजे जीव कर्म करीत असतांनाच त्यांना अमृत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

म्हणजे सुख किंवा दुःखहि मिळूं लागलें, असा अर्थ आहे. सुख हें शारीरिक किंवा मानसिक कर्मांच्या ठिकाणीं आहे हें आपण प्रत्यक्षच पाहतों त्यास अनुसरूनच हें म्हटलें आहे. हे तीन श्लोक फार महत्वाचे व सुंदर आहेत. ह्यांमध्ये जगाची उत्पत्ति कशी झाली व कशा-करिता झाली तें थोडक्यांत वस्तुस्थितीस अनुसरून सांगितलें आहे. ब्रह्म विकास पावलें व त्या विकासाची परिणति आनंदांत झाली हें येथे स्पष्टपणे सांगितलें आहे.

"अमृतम्" ह्याचा अर्थ श्रीशंकराचार्यांनी "कर्मजं फलं" असा केला आहे. तो निराधार आहे. अमृत म्हणजे सुख, आनंद असाच अर्थ सर्वत्र आहे. "ज्ञानादेव तु कैवल्यम्" असा सिद्धांत त्यांना स्थापा-वयाचा असल्यामुळे त्यांनी असा अर्थ केला. पण तो खरोखर होत नाही. "कर्मसुचामृतं" हें वाक्य ह्या उपनिषदांतील पुढील प्रतिपादन योग्य रीतीने समजण्याची किल्ली आहे. म्हणूनच त्याचा अर्थ श्रीशंकराचार्यांनी फिरविला.

मुंडक १ खंड २

मुंडक १ खंड २ श्लोक १-६

तदेतत्सत्यम्।
मंत्रेषु कर्माणि कवयो यान्यपश्यन्।
तानि त्रेतायां बहुधा संततानि ॥
तान्याचरथ नियतं सत्यकामाः।
एष वः पंथाः सुकृतस्य लोके ॥१॥
यदा लेलायते ह्यर्चिः समिद्धे हव्यवाहने।
तदाज्य भागावंतरेणाहुतीः प्रतिपादयेत् ॥२॥
यस्याग्निहोत्रमदर्शमपौर्णिमासम्।
अचातुर्मास्यमनाग्रयणमतिथिवर्जितं च ॥
अहुतमवैश्वदेवमविधिना हुतम्।
आसप्तमांस्तस्य लोकान् हिनस्ति ॥३॥
काली कराली च मनोजवा च।
सुलोहिता याच सुधूम्रवर्णा ॥
स्फुलिंगिनी विश्वरुची च देवी।
लेलायमाना इति सप्त जिह्वाः ॥४॥

एतेषु यश्चरते भ्राजमानेषु।
यथाकालं चाहुतयो ह्याददायन् ॥
तनयं त्येताः सूर्यस्य रश्मयो।
यत्र देवानां पतिरेकोऽधिवासः ॥५॥

एह्येहीति तमाहुतयः सुवर्चसः।
सूर्यस्य रश्मिभिर्यजमानं नयंति ॥
प्रियां वाचमभिवदंत्यो ऽर्चयंत्यः।
एष वः पुण्यः सुकृतो ब्रह्मलोकः ॥६॥

अर्थ—पुढे जें सांगितलें आहे [एतत्] तें [तद्] अगदी खरें आहे। शहाण्यांनी मंत्रांमध्ये जीं कर्में पाहिलीं म्हणजे शहाण्यांनी जीं कर्में पाहून मंत्रांत सांगितलीं, तींच त्रेतायुगामध्ये बहुतकरून (बहुधा) केलीं जात [संततानि]. तींच, तुम्हास जर खऱ्याची इच्छा असेल तर [सत्यकामाः] तुम्ही नेहमी आचरण करा [आचरथ]. तुमच्याकरिता सत्कर्मांचा [सुकृतस्य] हाच मार्ग आहे. ॥१॥ अग्नि इंधनांनी पेटविला असतां त्याची ज्वाळा जेव्हा ळळळळ करीत असते म्हणजे हालत असते [लेला-यते] तेव्हा तुपाच्या दोन आहुतींमध्ये [आज्यभागौ अंतरेण] आहुती द्याव्यात. ॥२॥ ज्यांचें अग्निहोत्र, दर्श-कर्मरहित, पौर्णमासकर्मरहित, चातुर्मास्यकर्मरहित, अग्र-यणकर्मरहित, अतिथिपूजनरहित, आहुतिरहित, वैश्वदेव-कर्मरहित आणि अयोग्यविधीने आहुति दिलेलें असेल त्यांचें तें अग्निहोत्र त्याच्या सातहि लोकांचा नाश करतें. त्याला भूरादि जे सात लोक आहेत त्यांपैकी कोणत्याहि लोकांचें सुख त्याला मिळत नाही असा भाव आहे.) ॥३॥ (१) काली, (२) कराली, (३) मनोजवा, (४) सुलोहिता, (५) सुधूम्रवर्णा, (६) स्फुलिंगिनी आणि (७) देवी विश्व-रुची अशा ळळळळणाऱ्या ह्या अग्नीचा सात जिव्हा (ज्वाळा) आहेत. ॥४॥ योग्यकाळीं प्रकाशणाऱ्या ह्या जिव्हांमध्ये आहुति देत जो अग्निहोत्राचें आचरण करतो, त्याला ह्या सूर्याच्या रश्मि, जेथे सर्वांच्या वर राहणारा [अधिवासः] देवांचा एकच पति म्हणजे ब्रह्म असतो तेथे म्हणजे ब्रह्मलोकास नेतात. ॥५॥ तेजस्वी अशा [सुवर्चसः] त्या आहुति, इकडे ये, इकडे ये, हा इकडे तुमच्या सत्कर्मांने बनविलेला [सुकृतः] आनंददायक

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

[पुण्यः] ब्रह्मलोक आहे” अशी प्रिय वाणी बोलत आणि त्याची पूजा करीत, सूर्याच्या रश्मींच्या सहाय्याने, त्या यज्ञ करणाऱ्याला [यजमानं] ब्रह्मलोकीं घेऊन जातात.॥६॥

टिप्पणी—“कर्मसुचामृतम्” असें मागे १।१।८ येथे सांगितलें. त्या अर्थी तीं कर्में कोणतीं हा प्रश्न येथे उत्पन्न होतो. त्या संबंधीचा पूर्वपक्ष ह्या श्लोकांत आहे व त्याचें खंडन पुढील श्लोकांत आहे. ज्या कर्माबरोबर वासनाभाव नसतो तीं कर्में सुखद होत नाहीत आणि वासनाभावास आत्मज्ञानाची गरज आहे, असा त्या खंडनाचा अर्थ आहे. ह्याच पूर्वपक्षाचें असेंच खंडन व्याससूत्रें ३।४।१–२६ येथे केलेलें आहे. ‘तदेतत्सत्यं’ यावरून ह्या सहा श्लोकांत जें सांगितलें तें सर्व खरेंच आहे असें मानूं नये. (कारण तें खोटें असलें तरी पूर्वपक्षकार तें खरें आहे असेंच म्हणेल) अर्थात् ह्या श्लोकांचा अर्थ उपपन्न असाच करण्याची गरज नाही. शब्दांवरून जसा होईल तसाच त्यांचा अर्थ करावा. म्हणून ब्रह्मलोक म्हणजे स्वर्ग असा अर्थ करणें बरोबर नाही व आवश्यकहि नाही.

“आचरथ”—हें आज्ञार्थ (लोट्) मध्यमपुरुष बहुवचन ह्याचें रूप आहे हें निश्चित आहे. पण तें अपाणिनीय आहे. पाणिनीय रूप “आचरत” असें होतें. अशींच अपाणिनीय रूपें मुंडकांत २।२।५ मध्ये (जानथ, विमुंचथ) आणि प्रश्नांत १।२ मध्ये (पृच्छथ) आणि २।३ मध्ये (आपद्यथ) आहेत. पालीमध्ये अशींच “थ” प्रत्ययांत रूपें होतात. ह्यावरून पालीभाषा उत्पन्न झाल्यानंतर हीं उपनिषदें झालीं असा कोणीं तर्क करतात पण तो चूक आहे. कारण फार प्राचीनकाळीं असा प्रयोग कोणत्या तरी प्रदेशांत चालूं असेल, तोच ह्या उपनिषदांत आला व तोच पुढे पाली भाषेंतहि आला असेंहि संभवतें व इतर रीतीने ह्या उपनिषदांचा काळ जर फार पुरातन ठरत असेल तर त्यास बाध न आणणारा हाच तर्क बरोबर ठरतो.

मुंडक १ खंड २ श्लोक ७-११

फ्लवा ह्येते अदृढा यज्ञरूपाः।
अष्टादशोक्तमवरं येषुकर्म॥
एतच्छ्रेयो येऽभिनंदति मूढाः।
जरामृत्युं ते पुनरेवापि यंति॥७॥

अविद्यायामंतरे वर्तमानाः।
स्वयं धीराः पंडितं मन्यमानाः॥
जंघन्यमानाः परियंति मूढाः।
अंधेनैव नीयमाना यथांधाः॥८॥

अविद्यायां बहुधा वर्तमानाः।
वयं कृतार्था इत्यभिमन्यंति बालाः॥
यत्कर्मिणो न प्रवेदयंति रागात्।
तेनातुराः क्षीणलोकाश्चवंते॥९॥

इष्टापूर्तं मन्यमाना वरिष्ठं।
नान्यच्छ्रेयो वेदयंते प्रमूढाः॥
नाकस्य पृष्ठे सुकृतेनुभूत्वा।
इमं लोकं हीनतरं वा विशंति॥१०॥

तपः श्रद्धे येह्युपवसंत्यरण्ये।
शांता विद्वांसो भैक्ष्यचर्यं चरंतः॥
सूर्यद्वारेण ते विरजाः प्रयांति।
यत्रामृतः स पुरुषो ह्यव्ययात्मा॥११॥

अर्थः—सोळा ऋत्विज, यजमान व त्याची पत्नी ह्या अठरा जणांचे [अष्टादश] हलक्या प्रकारचें [अवरम्] कर्म ज्यांत सांगितलें आहे त्या यज्ञरूपी नौका कच्च्या [अदृढाः] म्हणजे फुटक्या आहेत. जे मूढ लोक हें यज्ञकर्म हेंच कल्याण समजून त्यांचें अभिनंदन करतात म्हणजे तेंच आचरतात ते म्हातारपण व मृत्यु भोगण्यास पुनः परत येतात. ॥७॥ स्वतःस शहाणे (धीराः) व पंडित समजणारे परंतु अज्ञानांत [अविद्यायामंतरे] बुडलेले [वर्तमानाः] हे मूढ लोक, आंधळेच ज्यांना वाट दाखवितात त्या आंधळयांप्रमाणे अनेक प्रकारचीं दुःखें अनुभवत [जंघन्यमानाः] पुनः पुनः त्याच ठिकाणीं फिरून परत येतात, [परियंति] म्हणजे अभीष्ट ठिकाणास जाऊन पोचत नाहीत ॥८॥ बहु प्रकारच्या अविद्येंत बुडलेले हे मूढ आम्हीं कृतकृत्य [कृतार्थाः] झालों असें मानतात; परंतु

(पुढील मजकूर पान २० वर)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भारतीय नृत्याची पार्श्वभूमि

एम्. आर. देशपांडे

भारतीय नृत्य हें केवळ ऐतिहासिकच नव्हे तर भारतीय संस्कृतीचें तें एक चिरकाल व अबाधित असें चिन्ह आहे. त्यांत केवळ ऐतिहासिक उद्‌बोधकता नाही तर अक्षय अशी कलात्मक मनोरंजकता आहे. भारतीय आत्म्याचा त्यांत मूर्तिमंत आविष्कार आहे आणि प्रकृति व पुरुषाचा अविरत चाललेला एक स्वर्गीय विलास आहे. अक्षयता आणि काल यांचा तो सुंदर मिलाफ असून नर आणि नारी यांची त्यांत एकता आहे.

भारतीय नृत्यांत ध्वनि आणि लय यांच्या सुंदर मिलाफांतून निर्माण होणाऱ्या आध्यात्मिक काव्याचा अनुपम आविष्कार आहे. अशा या नृत्यांची आपण धर्म आणि संस्कृति पासून कदापिहि फारकत करूं शकत नाही. कारण या भारतवर्षांत धर्म आणि संस्कृति ही केवळ बौद्धिक किंवा ठराविक प्रकारचे बंधनात्मक नियम नसून तो एक अव्यक्ताचा अभेद्य प्रकार आहे व त्यांत ब्रम्हानंदीं पूर्णपणे पोहोचलेल्या साधुसंत व योग्यापासून तो थेट विषमय संसारांत गुरफटलेल्या विषयांनी भौतिक मनुष्याला मुक्ति देण्याचें विशाल सामर्थ्य आहे.

भारतीय संस्कृतीच्या प्रत्येक स्वरुपांत सर्वसाक्षी परमेश्वराचें विशाल रूप असून त्यांत अक्षय सुख या मोक्ष मिळविण्याची अनिवार अभिलाषा आहे. या अक्षय सुखाची व सत्‌चिदानंदाची प्राप्ती व्हावी म्हणूनच वेद, उपनिषद्, नृत्य आणि संगीत यांची योजना असावी असा तर्क करणें फारसें अवास्तव ठरणार नाही. म्हणूनच स्वर्गांतील देवतांना व अवनीच्या मानवांना आपआपल्या परीने नृत्य करून सत्‌चिदानंदांत विलीन होण्यास एक उत्कृष्ट माध्यम मिळालें. परंतु भारतीय नृत्य हें कांही मानवी प्रयोगकुशलतेची परिमिती नसून ती त्याला ईश्वरदत्त देणगी आहे.

नृत्याच्या पहिल्या पदन्यासाचा झंकार आपणास शंकराने योग्याच्या स्वरुपांत दाखविला. सर्व प्राणिमात्रांची एकता सूचित करण्यासाठी महादेवाने डम्बरूच्या डबडबांत विश्वनृत्यास प्रारंभ केला आणि शंकराच्या या नृत्यामुळे मानवावर एक नवीन संस्कृतीचा पगडा बसून सर्वश्रेष्ठ योग हा आत्मा आणि शरीर यांच्या पूर्णपणे झालेल्या एकतेंत आहे याचा मानवास प्रथम उलगडा झाला. आणि हीच आत्मा व शरिराची एकता नृत्यांतून हाशील करतां येते. याच कारणासाठी नृत्याला योगाचा प्रकार म्हटलें आहे. हा नृत्य योग केवळ शारीरिक हालचाली करून मिळवलेला नसून त्यांत ब्रम्हस्वरूपाशीं एकता मिळवून देण्याचें दैवी सामर्थ्य आहे.

भारतीय नृत्याची कल्पना पूर्णपणे दैवी स्वरूपाची आहे. प्रथम ब्रह्म नाचूं लागतें व त्यापासून झालेल्या ध्वनिक्षेपांत अस्तित्वांत असलेल्या सर्व शक्तींची न कळत हालचाल होऊं लागते. विजेच्या कडकडाटांत परब्रह्म थयथय नाचूं लागतें व नृत्यास लागणारी लय विश्वस्व रूपांतून झंकारित होते. याप्रमाणे श्रीकृष्ण परमात्मा वृंदावनांत गोपींसह नाचूं लागला आणि ती रासक्रीडा भारतीय इतिहासांत केवळ मनोरंजनाचेंच नव्हे तर एका महान् श्रद्धेचें स्वर्गीय साधन म्हणून समजण्यांत येतें. त्या नृत्याच्या लयमाधुर्यांत गोकुळवासी कृष्णाने आपल्यापासून अलग असलेल्या सर्व जीवांना आकर्षित केलें आणि रासक्रीडेंत रममाण होणाऱ्या प्रत्येक रमणीला त्या कृष्णाचें सावळें रूप आपल्या समवेत विभिन्न रूपाने नृत्य

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

करीत आहे असा मोहक भास होत असे. आत्म्याची एकता हेंच नृत्याचें अंतिम साध्य आहे आणि याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणून कृष्णाने गोपींसमवेत केलेली 'रासक्रीडा' हें देतां येईल.

नृत्यामध्ये 'जीवा'चें आकर्षण होऊन तो 'शिव' स्वरूपांत विलीन होतो. आत्मा आणि शरीर यांचा भेद नष्ट होऊन आत्म्याची ब्रम्हस्वरूपाशीं एकता होते आणि या दैवी नृत्यांतूनच शेवटीं सत्चिदानंदाचा साक्षात्कार होतो. अशा या नृत्यमीमांसेचा व्युत्पत्तिकार महर्षि भरत याने नटराजापासून नृत्यकला मानवासाठी अवनीवर आणली असावी असा तर्क सर्वत्र प्रचलित आहे. अशा या धार्मिक नी श्रद्धायुक्त पार्श्वभूमीवर भारतीय नृत्याची परंपरा विकसित झाली. भारतीय कलेची व्युत्पत्ति ही फार पुरातन आणि अनादि कालापासून आहे असा सर्वांचाच विश्वास आहे. आणि म्हणूनच भरताच्या 'नाटचशास्त्रां'त–जो आज एक अत्यंत पुरातन असा ग्रंथ समजण्यांत येतो. आपणास केवळ नृत्यकलेवरच नव्हे तर संगीत, काव्य, नाटच, शिल्पकला, नाटकगृहें आणि सौंदर्यशास्त्राच्या सर्व सामान्य रीती; यावर विद्वत्ताप्रचूर अशी सर्व माहिती विशिष्टेंकरून मिळते.

मानवांत जी कांही उत्पादक शक्ति आहे ती तो सर्व एका विश्वकर्त्यास पूजार्चेच्या साह्याने अर्पण करतो आणि म्हणूनच हिंदूंच्या सर्व पूजार्चेत कलेला अत्यंत महत्त्वाचें स्थान आहे.

भारतांतील सर्व मंदिरें कलेचीं माहेरघरें आहेत, कारण सर्व अव्वल दर्जाच्या कवींनी आपल्या कलेचें प्रदर्शन रसिकांसाठी प्रथम त्या ठिकाणीं केलें. तत्वज्ञानांतील सर्व कूट प्रश्न नी क्लिष्ट वादविवाद, जे मानवाच्या अचाट कल्पना भरारीचे व तर्कट विद्वत्तेचें प्रतीक आहे, तें सर्व प्रथम भारतीय मंदीरांत विवेचित करण्यांत आलें. यात मंदिरांत गायक व नृत्यविशारदांची नियुक्ति केलेली असे. पूजासमयीं संगीत आणि नृत्य हें केवळ पूजेसाठी एक तालबद्ध साधन नसून पूजेचा तो एक महत्वाचा भाग समजण्यांत येत असे. भारतीय मंदिरांत जोपासिल्या गेलेल्या या नृत्यकलेला पुढे विशिष्ट असें कलात्मक स्वरूप प्राप्त होऊन तें भारतीय संस्कृतिप्रदर्शनाचें एक उदात्त नी प्रभावी माध्यम बनलें.

भरताच्या नैपुण्यावर बेहद्द खूष होऊन शंकरानें आपल्या तंडू नांवाच्या गणाकरवी भरताला विश्वनृत्यासंबंधी पूर्ण माहिती घ्यावयास सांगितलें आणि तंडूने शिकविलेल्या नृत्यासच पुढे ताण्डवनृत्य असें नामाभिधान प्राप्त झालें. पार्वतीने स्त्रीसमाजांत नृत्यांची कल्पना रूढ व्हावी म्हणून अनिरुद्धाचे उषेला नृत्यकलेचे धडे दिले आणि पुढे तें 'लास्य' नृत्य म्हणून ओळखण्यांत आलें. हें नृत्य विशेषेकरून स्त्रियांच्या पदयुग्मांतून झंकारीत होतें. उषेने हेंच नृत्य सौराष्ट्रांतील द्वारकानिवासी रमणींना शिकविलें असा पुष्कळ ठिकाणीं अभिप्राय सापडतो व याच ठिकाणाहून हा नृत्यप्रकार सर्वत्र भरतवर्षांत प्रसारित झाला असावा असाहि विद्वानांचा तर्क आहे.

भारतीय नृत्याचा जन्म सौराष्ट्रांत झाला असावा हें म्हणणें जरी वादग्रस्त व आक्षेपार्ह असलें तरी त्याची उत्पत्ती फार पुरातन कालापासूनची असावी असा दाखला ऋग्वेदांत आपणास सापडतो. पुरातन कालांत नृत्य करून उपजीविका करणारे नर्तक व नर्तिका आपणास जरी इतिहासांत वाचावयास सापडतात तरी नृत्यकला शिकण्याकडे सर्वसाधारण व्यक्तींचा त्या काळांत कल असे असा अभिप्राय देखील आपणास इतिहासांत बऱ्याच ठिकाणीं सापडतो. बृहन्नडेच्या वेषांत अज्ञातवासी अर्जुन विराटाच्या दरबारांत संगीत व नृत्यकला शिकवीत असे असा दाखला आपणांस महाभारतांत सापडतो.

वेदिक कालामध्ये नृत्यकलेला जरी पोषक वातावरण व धनिकांचा आश्रय मिळाला नसला तरी त्या काळांत जातीयतेचें व सामाजिक करमणूकीचें तें एक साधन असावें आणि बृहन्नडाच्या शैक्षणिक दर्जामुळे त्याला सुसंस्कृत स्वरूप प्राप्त झालें असावें असा तर्कही संभवनीय आहे.

फारच जुनें असें पुरातन कालांतील नृत्यावर लिहिलेलें वाङ्मय आपणास जरी उपलब्ध नसले तरी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

महाव्याकरणकार पाणिनी जेव्हा 'नृत' या शब्दाची व्युत्पत्ती सांगतो तेव्हा तो शिलाजीन् व कृशाश्वीन् या दोन लेखकांनी लिहिलेल्या सूत्रांचा संदर्भ देतो. हे दोन व्याकरणकार वेदिक काळांतील या विषयावरचे अधिकारी पुरुष म्हणून समजण्यांत येत असत.

नाट्य या विषयावर 'नाट्यशास्त्र' ही भरताने लिहलेली सर्वप्रथम अशी विश्लेषणात्मक टीका होय. त्या वेळीं उपलब्ध असलेल्या सर्व वाङ्मयावरून असें वाटतें की भारतांतील नृत्यकलेचें सर्वदूर तंत्र हें एकच असावें. त्यानंतर नृत्यकलेवर पुष्कळसे ग्रंथ लिहण्यांत आले परंतु यापैकी नंदिकेश्वराने लिहलेलें 'अभिनयदर्पण' आणि सारंगदेवाचा 'संगीतरत्नाकर' हे विशेष महत्वाचे समजण्यांत येतात. भारतांतील इतर दुसऱ्या भाषेंत देखील नृत्यकलेवर फार महत्त्वाचें वाङ्मय आपणास वाचावयास सापडतें.

भारतीय सर्वदूर असलेल्या दरबारी नृत्यकलेचें तंत्र जरी एकच असलें तरी त्यावर प्रत्येक भागांत प्रचलित असलेल्या चालीरीतींचा प्रादेशिक पगडा बसल्यावाचून राहिला नाही. पुष्कळ ठिकाणीं आपणांस लोकनृत्याचे प्रकार भरत नाट्यामध्ये मिसळलेले आढळतात, तर कांही ठिकाणीं परकीयांचा व्यापार आणि स्वाऱ्या यांमुळे देखील या नृत्याच्या प्रकारांवर परकीयांचा पगडा बसला असावा असें वाटतें. अशा प्रकारच्या कित्येक कारणांमुळे एक भाग दुसऱ्या भागापासून असंपर्कित राखला जाऊन नृत्याचे प्रकारास त्या त्या भागांतील विशिष्टता प्राप्त झाली असावी व म्हणूनच आपणास आज नृत्याचे जे भिन्न प्रकार आढळून येतात त्याचें देखील कारण हेंच असावें असें समजणें वरेंच संभाव्य वाटतें.

अशाच प्रकारें भारतांत आज प्रचलित असलेलें 'भरत नाट्य' 'कथकली' 'मणीपुरी' आणि 'कथक' हे चार नृत्यप्रकार प्रादेशिक संपर्काच्या अभावी अस्तित्वांत आले असावे. मणीपुरी नृत्यांत आपणांस परकीय व प्रादेशिक चालीरीतींचा पगडा विशिष्टें-करून दिसून येतो तर 'कथक' नृत्यांत परकीय पगडाच जबर बसलेला आढळतो. 'कथकली' नृत्यांत लोकनृत्यांचा मिसळ झालेला आपणांस सापडतो व याचमुळे औचित्यदृष्ट्या कथकली हें नृत्य भरत नृत्यापासून भिन्न समजण्यांत येतें. 'कथकली' नृत्यांत पुष्कळशा नाट्यभावांचें दर्शन करण्यांत येतें की जें भरत नाट्याच्या दृष्टीने नृत्यमंचकावर विसंगत असून अनावश्यक आहेत.

एकंदरींत नृत्य प्रकारांत प्रादेशिक व ग्रामीण पगड्यामुळे जरी विभिन्नता प्राप्त झाली असली तरी भारतांतील सर्वदूर विखुरलेली नृत्यकला ही एकाच तंत्रावर आणि पार्श्वभूमीवर आधारित असावी हे निःसंशय ठरतें.

मराठवाड्यांतील एकमेव मराठी मासिक
मराठवाडा साहित्य परिषदेचें मुखपत्र
प्रतिष्ठान
दर महिन्याच्या १ तारखेस प्रसिद्ध होतें
समीक्षा, ललित, काव्य, संशोधन इत्यादि
विषयांवरील मौलिक साहित्य
आजच वर्गणीदार व्हा
वार्षिक वर्गणी रु. ५ किरकोळ अंक ८ आ.
जाहिराती स्वीकारल्या जातात
मराठवाडयाबाहेर एजन्सी देणें आहे. लिहा.
"प्रतिष्ठान" कार्यालय,
इसामिया बाजार,
हैदराबाद-दक्षिण.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

क वि ता

आज हासलें मीलन—

चार करांच्या मिठींत
आज हासलें मीलन
प्रकाशाच्या जाणीवेंत
बहरलें नीलांगण

मस्तावल्या ज्वारी आड
घोंघावला ओला वारा
लवणांत विसावला
काळ्या मातीचा निवारा

क्षितिजाच्या रेषेवर
काज़व्यांची रीघ लागे
तुझ्या माझ्या अंतरीचे
गुंतवीत निळे धागे

गगनाच्या पोकळींत
तारकांचे दाट थवे
तुझ्या माझ्या अधरांत
साकारलें गीत नवें

गीत नवें, प्रीत नवी
स्पर्श सखे, तुझा नवा
नवेंच हें संजीवन
माझ्या उबगल्या जीवा

नवी निराळी ही प्रीत
नवें निराळें संगीत
आज़ हासलें मीलन
चार करांच्या मिठींत

—बाबा मोहोड

संध्येची रांगोळी—

झाल्या आतां घटिका अठरा संध्येपासुनी
राजनी पाही ग्रहनक्षत्रें थेंबची घालूनी
परि जमेना थेंबही अवघे तेव्हापासूनी
काय करावें समजेना बघ बसली ती रुसुनी ॥१॥

रजनीचा हा रुसवा बघुनी
उषा सुंदरी दारीं येऊनी
सखे पुसावे थेंब जाड हे ग्रहनक्षत्रांचे
छान सानुले मौक्तिक सुंदर बघ दवबिंदूचे ॥२॥

इतुक्यामध्ये स्वारी आली बालरवीची तों !
कानीं लागुनी वसुधेच्या बघ कांही कुजबुजती
'मेघांच्या या कुंजामध्ये कोण गडे ! दिसतें
रंगावली बघ उषा सुंदरी रम्यची रेखीते ॥३॥

अन् खटयाळ रवीकर गालीं हसतो
नभांगणीची रांगोळी मग पायीं तुडवितो
गुलालाची मूठ भरूनी नभीं उधळितो
खेळ पाहूनी हा प्रेमाचा वसुधाही हसते ॥४॥

सोन्याच्या कासारीं गलवतें रंग भरूनी आलीं
परंतू ही बघ वनदेवी तर वेडावून गेली
टकमक पाहत स्वस्थ बैसली या मंगलकालीं
अन् पूर्व दिशा तर रंग दाविण्या उदया ही आली ॥५॥

रंग सिंचनें मेघही नटले मिश्रित रंगांनी
ह्या सोन्याच्या पिवळ्या कांही गुलाबी रंगांनी
उषा रमणीच्या गाली आणली त्यांनी ही आली
वनश्री फिरवी जणुं कांही ती जादुने भरली ॥६॥

कु. देवयानी केकरे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रतीक्षा—

वाजलें पाऊल
लागली चाहुल
वाटलें येईल
पंचप्राण
दिवस सरला
तिमिर भरला
टळली रे वेळा
यावयाची
साऊली पडली
पुढतिं दिसली
वाटलें पातली
राजमूर्ति
लोचन मिटले
श्वसन रोखलें
हृदय भरलें
उत्कण्ठेने
दूर कोपऱ्यांत
कोण हें हासत
चोरून पहात
भेटी कोण ?
मधुर मीलन
हृदयाचें दोन
प्रीतीचें नर्तन
नाचूं लागा
गीत गाई रान
आनंदें भरून
वाट मी पाहीन
राजीवाची
उतावीळ मन
डोळ्यांत जीवन
हातांत सुमन
रायासाठी
लोटली रजनी
आला दिनमणी
तिष्ठत कामिनी
बैसलेली.

कै. वसंत वल्लाळ

ध्येयनिष्ठ झालों—

(१)
ध्येयनिष्ठ झालों आतां
देह नष्ट जरी झाला
खंत नाही मनीं मुळी
अंत जरी होई आता !

(२)
काळचाकुट्ट अंबरांत
विद्युल्लता खुलतसे
वनांतील कुसुमांचा
वास कसा छान असे !

(३)
सागरांत क्षार विसे
क्षीरसागर जरी ते
जन्ममृत्यु अवनींत
चक्र परि भ्रमतसे !

(४)
ध्येयनिष्ठ झालों आता
देह निष्ट जरी झाला
खंत नाही मनीं मुळी
अंत जरी होओ आता !

—'अलिप्त'

येशू—

स्रवलें जें रुधिर सदय
देहातुनि क्रूसावर
तें अजुनी सळसळतें
एकट्या ह्या मंदिरांत. १
शिणलें जें भव्य भाल
काटेरी मुकुटांतच
तें अजुनी घुटमळतें
अंधुक त्या वाटेवर २
स्फुरले जे दिव्य हात
दलितांच्या रक्षणार्थ
ते अजुनी विस्फारुनि
येशू उभा विराणींत ! ३

मनोहर वझे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कोठी रोड

कृ. आ. मुंगीकर

मानव प्राण्याच्या अनेक व्याख्या करण्यांत आलेल्या आहेत. कोणी मानवास 'man is a rational being' म्हणतात, तर कोणी मानव हा अविचारी प्राणी आहे असें म्हणतात. समाजशास्त्रज्ञांच्या मतें मानव हा सामाजिक प्राणी आहे. man is a soial animal. एकाने तर मानव हत्यार तयार करणारा प्राणी आहे अशी व्याख्या केली आहे. शास्त्रज्ञांत तरी मानवाच्या व्याख्यांवर मतैक्य असेल तर शपथ !! अर्थ शास्त्रांत मानवाला आर्थिक प्राणी म्हणण्यांत येतें तर फ्राईडच्या मतें तो कामुक प्राणी आहे. man is a domestic अशी व्याख्याहि सुप्रसिद्धच आहे. पण या सर्व व्याख्यांत मानवाच्या स्वभावांतला एकेकच गुण दर्शिविलेला दिसतो. म्हणून व्याख्या अपूर्ण राहिलेली दिसते. मला यांपैकी कोणतीच व्याख्या पसंत पडत नाही हें सांगितलेलें बरें. कारण इतरांनी मानवाच्या व्याख्या आपापल्यापरी केलेल्या असून त्या जशा सदोष आहेत तशी मीहि माझी व्याख्या करणार आहे आणि तीहि सदोष ! मानव हा या रोडवरून त्या रोडवर व त्या रोडवरून या रोडवर भटकणारा प्राणी आहे. एवढेंच. त्याचबरोबर हें खरें की इतर व्याख्यांपेक्षा ही व्याख्या मानवाला जुळणारी आहे.

विचार करूं लागल्यास दिसून येईल की त्या व्याख्यांत जेवढी सदोषता आहे तेवढी सदोषता येथें नाही. फुलांत ज्याप्रमाणे कोमलता आणि आकर्षक आकार हे गुण असून देखील सर्वांत महत्वाचा गुण म्हणजे सुवास किंवा सुगंध हा होय त्याप्रमाणें मानवांमध्ये अर्थसंचय, सामाजिक तत्व, विचारीपणा, अविचारीपणा, लढाऊपणा इत्यादि गुण दसत असले तरी या सर्वांहून अधिक प्रकर्षाने, निःसंदिग्धपणाने तळपणारा गुण म्हणजे फिरणें हा आहे असें म्हणणें क्रमप्राप्त ठरतें. फुलांतला सुगंध चोहोकडे हवेबरोबर दरवळावा तद्वत मानवाच्या लहरीबरोबर मानवाच्या फिरण्याचा सुगंध दरवळत असतो. 'भटक्या जीवना'पासून तों आजच्या युगापर्यंत मानव भटकूं लागला आहे. पायीं, आगगाड्यांतून, मोटारींतून आणि विमानांतून माणूस सारखा फिरत आहे. जीवन हें गतिमान आहे असें म्हणतात तें केवळ भटकण्याच्या गुणावरून असें मला वाटतें. हें आणि अशा प्रकारचें विचारचक्र मोटारीच्या पंख्यासारखें गरगरूं लागतें. याचें कारण हें की कोठी-रोडवर मी मुसळधार पावसांतून, रखरखत्या उन्हांतून आणि कडाक्याच्या थंडींतून फिरफिर फिरलों आहे. आहे ! मला वाटतें भागानगरांत (हैद्रावाद) राहणारा कोणताहि तरुण–विशेषतः कॉलेजकुमार–हाच अनुभव घेत असावा ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे. कोठी रोडवरून संध्यासमयीं फिरतांना मला स्वर्गीय आनंद होऊन क्षणभर कां होईना, भागानगरींतला–मी तिला इंद्रनगरी संबोधतों—भाग्यवान् असल्याचें वाटून इंद्राचें वैभव उपभोगीत आहे असें वाटतें. आपण या कोठीरोडचे 'इंद्र' असून आपलें सरळ आधिपत्य यावर आहे असें माझ्या 'फिरत्या' विचारसरणीमुळे वाटतें. हें प्रभुत्व 'शेख महंमदी' थाटाचें तर खरेंच; पण मनुष्य आयुष्यांत 'शेख महंमद' केव्हा ना केव्हा तरी होत असतोच ना ? मी तर असें निःपक्षपातीपणानें, निश्चयाने आणि निःसंदिग्धपणाने म्हणेन की जो आयुष्यांत एक दिवस तरी 'शेख महंमद' होत नाही तो मनुष्य तर नाहीच नाही. पण प्राणीदेखील होण्याच्या लायकीचा नाही. एवढेंच नव्हे तर, तो केवळ दगड आहे दगड ! ! (लेखक नर्मदेचा गोटा असला पाहिजे, असा वाचकाचा तर्क फारच चुकीचा ठरेल असें नाही.) तें कसेंहि असो, पण कोठी रोडने फिरतां फिरतां प्रत्येकाने जसा शेख महंमदी दिमा-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

खावा, ऐटीचा व डामडौलाचा चषक प्यालेला असतो तसा तो मद्यचषक मीहि प्राशन केलेला असतो ही कबूली देत असतांना मला कांही दुर्लौकिकाची फिकीर वाटत नाही.

जादूगाराने इंद्रजाल पसरावें आणि सर्व प्रेक्षक आपलेसे करून घ्यावेत तसा कोठीरोड हा महा जादूगार आहे असें माझ्याप्रमाणे इतरांना वाटत नसावें असें थोडेंच आहे? वेदान्ती माणसें जग माया आहे असें समजून ब्रह्माच्या चर्चेच्या मोहजालांत फसतात. कोठी रोडच्या जादूने माझ्या मनावर इतकी भुरळ पडते की विचारूं नका. जादूगाराने पुंगीने आवाहन करावें आणि हां हां म्हणतां समूह जमावा तसें संध्याकाळच्या पांचसहाच्या ठोक्याचें वाद्य वाजतें न वाजतें तोंच तो रस्ता गर्दीने अगदी फुलून जातो आणि असें वाटतें की हा जनांचा प्रवाह जीवनसागराचें अमृत अगस्तीप्रमाणे सर्वशः प्राशन करावयास निघाला आहे की काय!! त्या रोडवरची सायंकाळची ती रीघच्या रीघ पाहिली म्हणजे मानव हा कोठी रोडवर फिरणारा प्राणी आहे याची पुरेपूर खात्री पटते. हा अमूप जनप्रवाह असंख्य माझ्यासारख्यांचा प्रतिनिधि आहे आणि म्हणून मला जरी रोज कोठी रोडवरून येण्याजाण्याचें भाग्य लाभत नसलें तरी मी माझ्या खेडेंगावांतून दररोज मनाने सहासातच्या सुमारास कोठी रोडचा फेरफटका करून येत असतों. इतका चटका मला 'कोठी रोड'चा लागलेला आहे. कोठी रोड म्हणजे जादूमयी नगरींतील 'राजमार्ग', कोठी रोड म्हणजे रात्रीच्या प्रकाशाचा सूर्य आणि कोठी रोड म्हणजे 'सभापर्वा'त मुक्तेश्वराने वर्णन केलेल्या धर्मराजाच्या मयसभेचें वैभव!

The nightfall in the city of Hyderabad' नांवाची सरोजिनी नायडूंची कविता ज्याने वाचली, त्याला भागानगरच्या प्रकाशाची कल्पना येऊं शकेल. पण प्रकाशाचा अभिजात विलास कोठे दिसत असेल तर कोठी रोडवर. प्रकाशाच्या लाटामागून लाटा वाहात असतात. कोण्या तरी जादूगाराने अमाप प्रकाश-गलाल उधळला असावा असें वाटतें. (नाही तर सामान्य रोडवर असा प्रकाश नाही हें विदित आहे). "Over the city bridge Night comes majestical, Borne like a queen to a sumptuous festival." अशा ओळी या हिंदकोकिळेला कोठी रोड पाहून सुचल्या की काय कोणास ठाऊक! पण माझी मात्र खात्री आहे की कोठी रोडवरून फेरफटका मारल्यानंतर काव्यसम्राज्ञीला ही कविता सुचली असेल.

कोठी रोडच्या प्रकाशाचें जें संगीत सुरू असतें तें अभूतपूर्व. अभिनव नृत्य पाहिल्यानंतर माणूस तल्लीन होतो तसें येथल्या प्रकाशाचें अभिजात नृत्य पाहिल्यावर माणूस मुग्ध होतो. तें प्रकाश-वसंताचें कोकिळ-कूजित असतें की शीतळ चंद्रिकेचें मधुर अमृतसिंचन असतें कुणास ठाऊक! प्रकाशाच्या गुलाब पाण्याचें सिंचन तर नसेल ना? किंवा प्रकाश-कुसुमांचा सुगंध मुक्तहस्ताने पिंजऱ्यांतून पक्षी सोडावेत तसा उधळण्यांत येत असावा. आम्र-मोहराचा सुगंध प्रकाशकिरणांत दडून बसलेला असेल आणि वाऱ्याच्या झुळकीबरोबर तो प्रकाशाच्या गतीनें पसरत असेल. प्रकाशमय अंतःकरण झाल्यानंतर कदाचित् असें वाटत असावें. तपश्चर्येने असें अंतःकरण प्राप्त होतें असें म्हणतात. पण मला वाटतें क्षणभर कां होईना, माझ्या अंतःकरणांतून जाळें जळमटें नष्ट पावून वेदांती माणसासारखें निर्मळ मन होतें. एक प्रकारची प्रकाश-शक्ति मिळते. वेदांती युगाचा अनुभव हें आधुनिक युग देतें तें या कोठी रोडवर. दुसऱ्याच ठिकाणीं स्वामी शिवानंद सरस्वती म्हणतात की, "He radiates peace, love and unity." या रस्त्याला He हें सर्वनाम लावून मी म्हणतों, "या प्रकाशांतून शांतता, प्रेम व ऐक्य लाभतें." या गोष्टी नसत्या तर सागरासारखा अलोट जनसमूह शांततेने, प्रेमाने आणि ऐक्याने इकडून तिकडे आणि तिकडून इकडे फिरतांना दिसला असता कां, याची वानवा आहे.

गंगेंत स्नान केल्यामुळे मन पवित्र व शांत होतें म्हणतात, पण जनसमूहाच्या गंगेंत फेरफटका मारून आल्याने तेवढेंच मन पवित्र व शुद्ध होतें. यांत कसलीच शंका नाही. कोठी-रोडवरची ये-जा करीत असतांना

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आपल्या मनांतील चिंता, काळज्या आणि कुविचार नष्ट होऊन क्षणभर कां होईना, वेदांती न होतां–ब्रम्हाच्या चर्चेवर आयुष्यांतला मोलाचा (?) वेळ व्यर्थ न घालवितां–जीवन्मुक्त झाल्यासारखें वाटल्यास नवल कसलें ? असंख्य लोक या रोडवर कां फिरत आहेत हें मला माहित नाही, पण मला मात्र दिव्य अनुभव या रस्त्यावर मिळतो, म्हणून भागानगरांत गेल्यावर पहिल्या प्रथम मी कोठे धाव घेत असेन तर त्या माझ्या आवडत्या रस्त्यावर फिरण्यासाठी !

हा रस्ता आवडण्याला आणखी एक कारण आहे. जेव्हा जेव्हा मी या रस्त्यावरून चालतों तेव्हा तेव्हा मला दोन प्रकारचीं स्वातंत्र्यें रक्षण करावीं लागतात. एक व्यक्तिस्वातंत्र्य व दुसरें सामाजिक स्वातंत्र्य. या रस्त्यांत फिरतांना स्वैरपणे फिरतां येत नाही. दुसऱ्याला मार्ग देत देत आपला मार्ग कुशलतेने काढावयाचा असतो. दुसऱ्याच्या स्वातंत्र्याचा विचार म्हणजे आपल्या स्वातंत्र्याचा विचार हा पाठ मिळतो तो येथेच ! आपण स्वतंत्र आहोंत ते दुसऱ्यांच्या स्वातंत्र्य हक्क रक्षणांतून. दुसऱ्याच्या स्वातंत्र्यासाठी आपण स्वतःचें स्वातंत्र्य थोड्या अंशाने का होईना कमी केलें पाहिजे. पूर्ण स्वतंत्र्याचा विकास असतो तो आपल्या स्वतंत्र्याच्या–स्वैरतेच्या–मर्यादेंत. स्वातंत्र्यवृक्ष फोफावण्यासाठी त्याच्या स्वैरतेच्या फांद्यांची काटछाट करावी लागत असते. सुप्रसिद्ध इंग्रजी ललित निबंध लेखक गार्डिनर म्हणतो, "we have both liberties to preserve our individual liberty and social liberty." निजामासारख्याच्या स्वैरवर्तनाला पहिला धक्का दिला तो या रस्त्याच्या या वृत्तीनेच (spirit). कांही वर्षांपूर्वी निजाम आपली मोटार उडवीत या रस्त्यावरून बेफामपणें जाऊं लागला तों या रस्त्याने त्याला थांबविलें. निजामाला थांबावें लागल्याने त्याला उपमर्द झाल्यासारखें वाटून त्याने त्या रस्त्यावरची येजा सोडली. पण हा रस्ता त्याची मनधरणी करण्याकरतां गेला नाही. रस्त्याला त्याची क्षिति नव्हती. या घटनेवरून लोक काय तर्क करतात तें मला माहीत नाही. पण या रस्त्याचें राजकारण दिल्लीच्या रस्त्याच्या राजकारणाला जोडलेलें होतें असें मला फार दिवसापासून वाटे. (निजाम स्टेट हिंदी राज्याचा अविभाज्य घटक आहे असा याचा अर्थ होता).

कोठी रोडचा नूतन नामकरण विधी मोठ्या थाटामाटांत साजरा व्हावयास हवा. पण आमचें अरसिक सरकार किंवा जनता कोठे याकडे लक्ष देत आहे ? शिवाय कोठी रोड ज्या आळींतून जातो तिचें नांव तरी काय आहे तें सर्वांना विदित आहे ? सुलतान बाजार ! सुलतान बाजार हें नांव का पडलें याचा इतिहास मला माहीत नाही; पण इस्लामी राजवटींत इस्लामी संस्कृतीची बीजें नामाभिधानांत देखील दृग्गोचर झालेलीं दिसून येतात. पण आमचा अरसिकपणा पराकोटीला पोचलेला आहे. मूळचें भागानगर असून हैद्राबादचें भागानगर होत नाही तर कोठी रोडचा बी. रघुनाथ व्हावयाचाच नाही. तशी सुलतान बाजारची नानलपेठ व्हावयाची नाही. आमच्या अरसिकपणामुळे आम्हांला 'बदलां'तलें रहस्य उमगलेलें नाही. 'change is the spice of life.' नवनवीन व अभिनव नामाभिधान करणें हें राष्ट्रीय वृत्तीचे द्योतक आहे हें आमच्या लोकराज्याच्या शासकांना कळलेलें नाही असें मधून मधून मला वाटतें. संशय येतो तो हा की आम्ही स्वातंत्र्य मिळविलें म्हणजे आळशावर स्वातंत्र्याची गंगा तर आली असेल ना ? जी राष्ट्रीय वृत्ति रोमच्या इ. स. पूर्वीच्या ऑगस्टसच्या वाङ्मयांत व रोमच्या आचरणांत दिसून येते ती अद्याप आपल्यांत दिसत नाही. नाही तर आपण या बाबतींत उदासीन राहिलों असतों का ? मी जर मोठा झालों तर–अर्थात् या जन्मीं तरी शक्य नाही–पहिल्या प्रथम नूतन नामाभिधानाचें काम हातीं घेईन आणि गोंडस, लुसलुशीत, सार्थ, राष्ट्रीय आणि ऐतिहासिक अशीं नांवें देईन.

'मिरी' या साने गुरुजींच्या कादंबरींतील कृपाकाका हें पात्र म्युनिसिपालिटीच्या रस्त्यावरचे दिवे लावण्याचें काम करतें. कृपाकाका हे माणुसकीचे दीप लावणारे असतात. कोठीरोड हा कृपाकाका आहे ! माणुसकीचे दीप निर्माण करावयाचे होते म्हणून त्याने पहिल्यांदा आळा घातला तो निजामाच्या बेताल

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वर्तनाला. समतेचा दीप अगोदर भागानगरांत लावण्यांत आला तो या रोडवर. नाहीं तर मोजमजाही आणि आजमजाही रोडवर काय कमी प्रकाश आहे, असें थोडेंच आहे. पण त्यांपैकी एकहि रोड मला पसंत नाही.

भागानगर राज्याच्या 'इंडियन युनियन' मध्ये विलिनीकरणाच्या प्रश्नाला चालना मिळाली ती या रोडच्या गल्लींतून. इ. स. १९३८-३९ सालीं झालेल्या सत्याग्रहाचें हत्यार परजलें त्यावेळीं या रोडची कामगिरी अधिक होती. नभोमंडळांत ऐश्वर्याचा उपभोग घेत असलेला निजामी राज्याच्या पतंगाचा दोर पहिल्याप्रथम कोठी रोडवरच्या सत्याग्रहाने अंशतः कापला गेला. निजामी सत्ता हादरली ती यावेळींच.

कोठी रोडवरचे विविध प्रकाशाचे दीप जणूं कांही कोणाचा प्रकाश अधिक आहे यासाठी स्पर्धा करीत आहेतसे दिसतें. लाल, निळचा, हिरव्या आणि असमानी रंगाचे प्रकाशदीप आकाशांतील तारकांना लाजवितात आणि त्यांच्याकडे पाहून विकट-हास्य करतांना दिसतात. आपल्या सामर्थ्यानें ते दीप उत्फुल्ल तर होत नसतील ना ? दीपप्रकाशांत डुंबून निघालेला मानवसमूह इतका तेजस्वी दिसतो की विचारतां सोय नाही. इंद्रधनुष्यांतील रंग पाहतांना मनुष्य जसा आनंदित होतो तसा प्रकाशाचें इंद्रधनुष्य पाहतांना मनुष्य इतका बेहोष व बेभान होतो की त्याचें वर्णन करतां येत नाही. वैचित्र्यपूर्ण रंगांची बहार पाच मण्यांच्या प्रकाशापेक्षा जास्त वाटते. दीपावलीची महालक्ष्मी अमोल वस्त्रें परिधान करून अवतरल्यासारखें वाटतें. मानव प्रतिसृष्टि निर्माण करणारा विश्वामित्र असल्याचा प्रत्यय या ठिकाणीं आल्यावाचून राहत नाही. मानवानें प्रकाशाची प्रतिसृष्टि निर्माण केली असें साक्षेपानें प्रतिपादितां येतें. विज्ञानाच्या साह्याने मानव पृथ्वीसाठी आणखी कृत्रिम चंद्र तयार करणार असल्याचें ऐकण्यांत येतें. तें केव्हा होईल तें होवो; पण कोठी रोडवरचे दीप म्हणजे लहान लहान आकाराचे चंद्र होत !!

विचार करतां करतां माझ्या मनांत येतें की 'एकच प्याल्या'ने सुधाकर लुब्ध झाला. कांही वस्तु माणसाला लुब्ध करून सोडतात. सौंदर्य माणसाला भुरळ पाडीत असतें. ज्या माणसाला सौंदर्यदृष्टि आहे तो सौंदर्याचें प्राशन करूं लागतो, अगदी सुधाकराप्रमाणें. विशेष कारण नसतांना देखील मी कोठी रोडवर फिरलेलों आहे. विशेषतः सहाच्या नंतर बेभान होऊन फिरलों आहे. भागानगरचें जाणें येणें खर्चाचें असल्याने तेथे जाण्याचें भाग्य कमी लाभतें. जेव्हा जेव्हा मी जातों तेव्हा तेव्हा मोठ्या उत्सुकतेने तासन्‌तास फिरतों. पण दररोज फिरावयास न मिळाल्यास्तव मन अतृप्त असतें. मी आशावादी असल्याने ही इच्छा पूर्ण होईल असें वाटतें. हैद्राबादच्या एकाद्या कॉलेजांत आपली प्राध्यापकाच्या कामासाठी (एम्. ए.) नसतांना नेमणूक (अर्ज दिला नसतां) होईल व आपण कोठी रोडवर तासचे तास घालवूं आणि कोठी रोडचा एखादा 'भक्त' या माझ्या कामांत साह्य करील असें वाटतें. पाहावें काय होतें तें ! 'अनंत आमुची ध्येयासक्ति अनंत अन् आशा । किनारा तुला पामराला ।'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ग्रं थ स मा लो च न

कलचुरी–चेदि संवताचे कोरीव लेख

(संपादक—म. म. प्राचार्य वासुदेव विष्णु मिराशी. प्रकाशक–गव्हर्नमेंट एपिग्राफिस्ट फॉर इंडिया, उटकमंड, पृष्ठें–भाग १—५६७; भाग २–३४८, किंमत दिली नाही.)

हा ग्रंथ भारत सरकारच्या पुरातत्त्व–विभागातर्फे भारतीय उत्कीर्ण लेखसंग्रह (कॉर्पस् इन्स्क्रिप्शनम्) या ग्रंथमालेंतील चौथा ग्रंथ म्हणून अलीकडे प्रकाशित झाला आहे. याच्या पूर्वी या मालेचे जे तीन ग्रंथ प्रकाशित झाले होते त्यांचें संपादन विदेशी विद्वानांनी केलें होतें. या ग्रंथमालेंतील ग्रंथाचें संपादन करणारे श्री. मिराशी हे पाहिलेच भारतीय विद्वान् होत ही आम्हास अत्यंत आनंदाची व गौरवाची गोष्ट होय.

ह्या ग्रंथाचे दोन भाग आहेत. पहिल्या भागांत श्री. मिराशींनी लिहिलेली विद्वत्तापूर्ण प्रस्तावना आणि कलचुरि संवताचे आरंभींचे कोरीव लेख, व त्रिपुरीच्या कलचुरींचे सर्व कोरीव लेख यांचा समावेश केला आहे. दुसऱ्या भागांत राहिलेले त्या संवताचे लेख दिले आहेत. अर्थातच या ग्रंथाचा उद्देश कलचुरि संवताचा ज्यामध्ये निर्देश आहे असे, आभीर, त्रैकूटक. आद्य गुर्जर, सेंद्रक, गुजरातचे आद्य चालुक्य, माहिष्मती, त्रिपुरी, सरयूपार व रतनपुर येथील कलचुरि, वगैरेंचे लेख एकत्र प्रकाशित करणें हा आहे. कलचुरींच्या इतिहासाकरिता आवश्यक असे इतर कांही लेख—ते इतर संवताचे असले तरी—यांत घेतले आहेत; कारण कलचुरींच्या इतिहासाचे दुवे जुळविण्यास त्यांचा येथे संग्रह करणें आवश्यक वाटलें. कल्याणाच्या कलचुरींचे लेख मात्र यांत दिले नाहीत; कारण की त्यांपैकी एकहि कलचुरि संवताचा नाही.

आपल्या विद्वत्तापूर्ण प्रस्तावनेंत श्री. मिराशींनी प्रथम कलचुरि–चेदि संवताची सविस्तर चर्चा केली आहे. या संवताचा आरंभ केव्हा व कसा झाला. याचें विवेचन करतांना त्यांनी आपल्या पूर्वीच्या सर्व लेखकांच्या व विद्वानांच्या मतांचें परीक्षण करून आपलें निश्चित मत स्थापित केलें आहे. सर्वांत प्रथम प्रोफेसर हॉल याला अशी शंका आली की कलचुरींचे शिलालेख शकसंवत् किंवा विक्रमसंवत याचे नाहीत; त्यांमध्ये एका निराळ्याच संवताचा उपयोग केला आहे व तो संवत बहुधा ई. स. २५० मध्ये सुरू झाला असावा. सन १८७८ च्या सुमारास कनिंगह्याम व बेग्लर यास कांही लेख सापडले. त्यांमध्ये या संवताचें नांव कलचुरीसंवत किंवा चेदिसंवत् असें दिलें आहे. चेदि देशांतील राजे हैहय–कलचुरींपैकीच असावे असें वाटून कनिंगह्यामने कलचुरी–चेदि संवत् हा इसवी सन २४९ मध्ये सुरू झाला असें प्रतिपादिलें.

यानंतर भारताच्या नैर्ऋत्य भागांत असे कांही कोरीव लेख सापडले की त्यांमध्ये शक किंवा विक्रम संवताव्यतिरिक्त दुसऱ्या एका संवताचा उपयोग केला आहे. प्रथम या संवताला विद्वानांनी 'त्रैकूटक संवत्' असें नांव दिलें, पण याचा आरंभकाल कलचुरि संवताच्या आरंभकालाजवळ येत असल्यानें हे दोन्ही संवत् एकच नसतील काय अशी शंका विद्वानांना आली. शेवटीं प्रोफेसर कीलहॉर्नने सन १८८७–८८ मध्ये असा शोध लावला की या चेदि संवताचा आरंभ सन २४९ मध्ये झाला नसून सन २४८ मध्ये झाला होता. कीलहॉर्नने असेंहि सिद्ध केलें की हा संवत भाद्रपद शुक्ल प्रतिपदा, विक्रमसंवत् ३०७ (२८ जुलै २४८) मध्ये सुरू झाला. नंतर त्याने आपलें मत बदललें आणि असें निश्चित केलें की त्या संवताचा आरंभ इ. स. २४८ मध्ये आश्विन शुक्ल प्रतिपदेला झाला;

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यानंतर डॉ. फ्लीट, प्रो. रॅप्सन्, डॉ. देवदत्त रामकृष्ण भांडारकर, डॉ. रमेशचंद्र मुजुमदार, रायबहादूर हीरालाल प्रभृति विद्वानांनी या विषयावर आपापलीं मतें व्यक्त केलीं डॉ. मुजुमदारांचें मत असें होतें की हा संवत् कुशाण नृपति कनिष्कने स्थापन केला. डॉ. जायसवाल म्हणत की तो वाकाटकांनी सुरू केला. पण प्रो. मिराशींनी यापूर्वी आपल्या अनेक लेखांत दाखविल्याप्रमाणे कलचुरि संवताच्या मिती दोन प्रकारच्या दिसतात. पहिला प्रकार गुजरात व महाराष्ट्र यांमध्ये सापडलेल्या कोरीव लेखांत आढळतो, तर दुसरा प्रकार मध्यप्रदेश, विंध्यप्रदेश आणि उत्तरप्रदेश यांमध्ये मिळालेल्या लेखांत दिसतो. पहिल्या प्रकारच्या मितींवरून या संवताचा आरंभ इ. स. २४९–५० मध्ये व दुसऱ्या प्रकारच्या मितींवरून तो इ. स. २४८–४९ मध्ये झाला होता असें दिसतें. वर्षारंभ कार्तिक शुक्ल प्रतिपदेस होत असे. नंतर ह्या संवताचा आरंभ कोणी व व कसा केला, त्याचा प्रचार प्रथम कोणत्या प्रदेशांत होता, इत्यादि सर्व प्रश्नांवर प्रो. मिराशींनी विवेचन करून विस्तृत प्रकाश पाडला आहे.

कलचुरि-चेदि संवताविषयींच्या प्रश्नांचा सविस्तर विचार केल्यावर लेखकाने या संवताचा ज्यांनी उपयोग केला त्या राजवंशाच्या राजकीय इतिहासावर संक्षिप्त पण उत्तम प्रकाश पाडला आहे. आभीर नृपति व त्यांचे सामंत, त्रैकूटक, कलचुरि, आद्य गुर्जर, सेंद्रक, आद्य चालुक्य प्रभृति राजांच्या इतिहासाच्या अनेक जटिल व गुंतागुंतीच्या समस्या सप्रमाण सोडविण्याचा प्रो. मिराशींनी उत्कृष्ट प्रयत्न केला आहे. या राजवंशांच्या राजकीय इतिहासाबरोबर त्यांची राज्यव्यवस्था, तत्कालीन धार्मिक, सामाजिक व आर्थिक स्थिति, साहित्य व संस्कृति, नाणीं इत्यादींवरहि प्रकाश पाडला आहे. नाण्यांची एक प्लेट देऊन तींत त्रैकूटक व कलचुरि यांच्या सोनें, रुपें व तांबें या धातूंच्या नाण्यांचे नमुने दिले आहेत. प्रस्तावनेनंतर या सर्व राजवंशांचे वंशवृक्ष देऊन त्यांतील प्रत्येक राजाच्या नांवाखाली त्याच्या कारकीर्दीचीं वर्षें दिलीं आहेत.

त्यानंतर १२८ कोरीव लेख दिले आहेत. या लेखांच्या संपादनांत प्रथम त्या त्या लेखाची प्राप्ति, स्वरूप, महत्त्व आदिविषयीं संक्षिप्त माहिती देऊन नंतर त्याचा मूळ पाठ व शेवटीं इंग्रजी अनुवाद दिला आहे. तळटीपांत भिन्न भिन्न विद्वानांचीं मतें व इतर आवश्यक माहिती दिली आहे. कांही थोड्या लेखांशिवाय इतर सर्व लेखांचे छाप दिले आहेत. यांमुळें शंका येईल त्या ठिकाणीं विद्वान वाचकांना मूळ लेखांचें पुनः परीक्षण करतां येईल. सामान्य वाचकांसहि त्या लेखांची सध्याची अवस्था, त्यांची लिपी वगैरे विषयीं माहिती होईल. पूर्वी कलचुरि संवताचे तसेंच कलचुरि राजवंशाचे कोरीव लेख अनेक संशोधन मासिकांमध्ये व पुस्तकांमध्ये विखुरलेले होते व कांही तर अप्रकाशित होते. त्यांचा अभ्यास करण्याकरिता अनेक पुस्तकें हुडकावीं लागत. त्यांतील कांही आता दुर्लभ झालीं आहेत. आता हा लेखसंग्रह प्रकाशित झाल्यामुळे संशोधकांची व विद्वानांची सर्वांत मोठी सोय ही झाली आहे की हे सर्व लेख आता एकत्र मिळतील. शिवाय पूर्वींच्या विद्वानांच्या वाचनांत ज्या उणीवा राहून गेल्या होत्या, त्या प्राध्यापक मिराशींनी पुऱ्या केल्या आहेत आणि अनेक लहानमोठ्या चुका दुरुस्त केल्या आहेत.

ग्रंथाची छपाई सुंदर आहे. पण मुद्रितांच्या अनेक चुका राहून गेल्या आहेत. प्रा. मिराशींनी सौजन्य व शिष्टाचार यांस अनुसरून हा दोष स्वतः स्वीकारला असला तरी वाचकांना मुद्राराक्षसाचा चांगलाच परिचय असतो. या ग्रंथाच्या पहिल्या भागांत तीन नकाशे व ६१ प्लेटी व दुसऱ्या भागांत ४२ प्लेटी दिल्या आहेत.

शेवटीं अशा संशोधनात्मक ग्रंथाचें संपादन केल्याबद्दल आम्ही प्रो. मिराशींना धन्यवाद देतों. अशा प्रकारच्या ग्रंथाचें संपादन भारतीय विद्वानाने प्रथम करण्याचा मान आमच्या मध्यप्रदेशांतील विद्वानास मिळाला याचा आम्हांस अभिमान वाटतो.

कलचुरींच्या इतिहासाविषयी आवड असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला हा ग्रंथ आवश्यक व अपरिहार्य आहे.

—बालचंद्र जैन

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मुंडकोपनिषद्

(पान ८ वरून)

ज्याअर्थी केवळ यज्ञकर्म करणारे हे लोक [कर्मिणः] वासनेमुळे [रागात्] खऱ्या आनंदाचा अनुभव जाणत नाहीत [प्रवेदयंते] त्या अर्थी त्यांना मिळालेल्या लोकांचा क्षय होऊन [क्षीणलोकाः] ते दुःखी होतात [आतुराः] आणि खाली पडतात. ॥९॥ यज्ञ आणि धर्मार्थ तळीं वगैरे बांधणें [इष्टापूर्त] हेंच वरिष्ठ मानणारे हे अतिशय मूर्ख लोक दुसरें अधिक मोठें कल्याण [श्रेयः] जाणत नाहीत. ते आपल्या सत्कर्मांनी मिळविलेल्या [सुकृते] स्वर्गांत [नाकस्य पृष्ठे] कांही काळ सुखाचा अनुभव घेऊन [अनुभूत्वा] ह्या मनुष्य लोकांत [इमं लोकम्] किंवा ह्यापेक्षाहि वाईट अशा पशुलोकांत प्रवेश करतात. ॥१०॥ परंतु अरण्यांत राहून भिक्षा मागून राहणारे (म्हणजे यज्ञकर्में न करणारे असा भाव आहे), जे तपः म्हणजे विषयानंदत्याग, आणि श्रद्धा म्हणजे आत्मानंदत्वावर आणि आत्माद्वैतावर दृढ विश्वास ह्यांचें आचरण करतात [उपवसंति], वासनारहित [शांताः] असतात ते निष्पाप [विरजाः) होऊन सूर्यद्वाराने, जेथे तो कधीच नाश न पावणारा [अव्ययात्मा] व आनंदवान् [अमृतः] पुरुष म्हणजे नामरूपातीत ब्रह्म असतें तेथे जातात म्हणजे जन्ममरणाच्या फेऱ्यांतून मुक्त होतात असा भाव आहे. ॥११॥

टिप्पणें—"अव्ययात्मा अमृतः पुरुषः" म्हणजे ह्याच उपनिषदांत शेवटीं (३।२।८ येथे) सांगितलेला "परात्पर दिव्य पुरुष" म्हणजे ब्रह्म हें अगदी स्पष्ट आहे. कारण दोनहि ठिकाणीं आत्मज्ञानीच गति सांगितली आहे.

"सूर्यद्वारेण"—"सूर्यद्वारेण" म्हणण्याचें कारण छांदोग्य ४।१५ व ५।१० हीं प्रकरणें वाचल्याने समजेल. तेथे "धूमादि" व "अर्चिरादि" अशा दोन गति वर्णिल्या आहेत. धूमादि गतींत पुनर्जन्म आहे व तो मार्ग सूर्यांतून जात नाही. अर्चिरादि गतींत मनुष्य ब्रह्मांत जाऊन मिळतो [ब्रह्मं गमयति] आणि पुनः जन्म घेत नाही [इमं मानवमावर्तं नावर्तंते] आणि हा मार्ग सूर्यांतून जातो. म्हणून अकराव्या श्लोकाचा भाव पुनर्जन्म पावत नाही असा काढावा लागतो. श्लोक ७-१० मध्ये अज्ञानी पुनः जन्म घेतो असें सांगितलें आहे. त्याच्या उलट ज्ञानी पुनः जन्मत नाही असाच भाव श्लोक ११ मध्ये असला पाहिजे. व तो "सूर्यद्वारेण" ह्या "अर्चिरादि" -मार्गदर्शक शब्दाने समजून येतो. "भैक्ष्यचर्यं चरंतः" हे शब्द कोणताच आश्रम दाखवीत नाहीत; कारण गृहस्थालाहि भिक्षा मागतां येते आणि दोनहि प्रकारच्या ब्रह्मचाऱ्यांस भिक्षेवरच निर्वाह करावा लागतो. ह्या शब्दांचा खरा अर्थ समजण्यास संदर्भाकडे पाहिलें पाहिजे. श्लोक १-६ मध्ये पूर्व पक्ष आहे. त्याचें तात्पर्य ब्रह्मप्राप्तिकरिता "यज्ञ" केलेच पाहिजेत असें आहे. पुढील श्लोकांत ह्या पूर्वपक्षाचें खंडन आहे. श्लोक ७-१० मध्ये यज्ञाचें हलकें फळ दाखविलें आहे. श्लोक ११ मध्ये "तपस् आणि श्रद्धा" ह्यांचें उच्च फळ दाखविलें आहे. येथेच हें उच्च फळ यज्ञाशिवायच मिळतें किंवा यज्ञाच्या साहाय्याने मिळतें हें सांगणें जरूर आहे आणि तें सांगण्याकरिताच "भैक्ष्यचर्यं चरंतः" हे शब्द योजिले असले पाहिजेत. कारण हें सांगणारे दुसरे शब्दच नाहीत. म्हणून ह्यांचा अर्थ "भिक्षेवर उदर-पोषण करणारे म्हणून दरिद्री व ज्यांना पुष्कळ पैसा लागतो असे यज्ञ करण्यास असमर्थ" असा करावा लागतो. ह्याचा अर्थ हें उच्च फळ यज्ञाशिवायच मिळतें असा आहे. श्रीव्यासहि अतएव "अग्नींधनाद्यनपेक्षा" (३।४।२५) ह्या सूत्रांत हेंच म्हणतात. ह्याचा अर्थ सर्वकर्मत्याग करावा असा होत नाही. म्हणून ह्या अकराव्या श्लोकांत सर्वकर्मत्यागाचा विधि आहे हें समजणें योग्य नाही. "कर्मसु चामृतम्" असें सांगणारें उपनिषद् सर्व कर्मांचा त्याग कधीच सांगणार नाही. शिवाय उपनिषदांत पुढे "आत्मक्रीड, आत्मरतिः क्रियावान् एष ह्याच ब्रह्मविदां वरिष्ठः" (३।१।४) ह्यांत सत्क्रिया करणारा [क्रियावान्] सर्व ब्रह्मवेत्त्यांमध्ये श्रेष्ठ होय असें स्पष्ट म्हटलें आहे. व्याससूत्र ३।४।२५-२६ ह्यांतहि यज्ञकर्में करणें काम्य ठरविलें आहे (तेथील आमचें विवरण पहा), यज्ञकर्मांचा त्याग करावाच असा देखील विधि ह्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्लोकांतून काढतां येत नाही. ह्या श्लोकांत "तपः आणि श्रद्धा" ह्यांचें आवश्यकत्व आणि विधान सांगितलें आहे· आणि ते दोन असतील तर यज्ञकर्म देखील नसलें तरी चालेल असें सांगितलें आहे. पण सर्व कर्मांचा त्याग सांगितला नाही हें श्लोक ३ । १ । ४ वरून व "कर्ममु चामृतं" ह्यावरून सिद्ध आहे. व्याससूत्रें ३।४। २७-३५ ह्यांत निर्दिष्ट केलेलीं कर्में म्हणजे प्राणधारण करणारी कर्में, आश्रमकर्में, आणि शमदमादि हीं आवश्यकच आहेत.

मुंडक १ खंड २ श्लोक १२-१३

परीक्ष्य लोकान् कर्मचितान् ।
ब्राह्मणो निर्वेदमायान्नास्त्यकृतः कृतेन ॥

तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत् ।
समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम् ॥१२॥

तस्मै स विद्वानुपसन्नाय सम्यक् ।
प्रशांतचित्ताय शमान्विताय ॥
येनाक्षरं पुरुषं वेद सत्यम् ।
प्रोवाच तां तत्वतो ब्रह्मविद्याम् ॥१३॥

अर्थः—केवळ कर्मांनी प्राप्त होणाऱ्या [कर्मचितान्] लोकांची परीक्षा करून म्हणजे ते लोक विनाशी आहेत असें समजून घेऊन शहाण्या मनुष्याने [ब्राह्मणः] केवळ कर्मांनी प्राप्त होणाऱ्या लोकांविषयी विरक्त व्हावें [निर्वेदमायात्] कारण केवळ कर्मांनी मनुष्य कर्मरहित केव्हाच होणार नाही. म्हणजे कर्मांच्या वासनारूपी आणि दुःखरूपी फलांतून केव्हाच सुटणार नाही. म्हणून [तत्] ज्ञानाची म्हणजे कर्मांच्या वासनादुःखरूपी फलांतून ज्याने सुटेल त्या ज्ञानाची प्राप्ती करून घेण्याकरिता [विज्ञानार्थं] हातांत समिधा घेऊन मनुष्याने ज्याने वेदांचें व इतर ग्रंथांचें अध्ययन केलें आहे [श्रोत्रिय] आणि जो ब्रह्मनिष्ठ आहे अशा गुरूजवळच जावें. ॥१२॥ योग्य रीतीने जवळ आलेल्या त्या शांतचित्त आणि शमयुक्त शिष्याला, जिने सत्य म्हणजे अविनाशी अक्षर पुरुषाचें ज्ञान होतें ती ब्रह्मविद्या तत्वतः सांगावी. ॥१३॥

टिप्पणें:—"ब्राह्मणः"—ब्राह्मण म्हणजे "ब्राह्मण वर्णाचा" असा अर्थ करूं नये; कारण ब्रह्मविद्या शिकण्याचा सर्वांनाच अधिकार आहे. "ब्राह्मण" म्हणजे ब्रह्मज्ञ असाहि अर्थ करूं नये, कारण त्याला ब्रह्म जाणून घे असें सांगावयाचें आहे. म्हणून ज्या अर्थी बुद्धि व शहाणपणा हें ब्राह्मणाचें मुख्य लक्षण आहे त्या अर्थी ब्राह्मण म्हणजे शहाणा मनुष्य असा अर्थ करावा.

"श्रोत्रिय"—वेदादि ग्रंथांचें अध्ययन केल्यामुळे हुशार झाल्याने जो शंकांचें समाधान करण्यास समर्थ आहे तो.

"ब्रह्मनिष्ठ"—ज्ञानाप्रमाणे स्वतः वागून ब्रह्मानंदाचा स्वतः अनुभव घेणारा. असा अनुभव घेतल्याशिवाय शंकांचें समाधान करण्याचें पूर्ण सामर्थ्य येत नाही.

"समित्पाणिः"—समिधा ह्या शिष्यत्वबुद्धि व नम्रता ह्यांचें चिन्ह पूर्वी मानत असत म्हणून "समित्पाणि" असें म्हटलें आहे.

"प्रोवाच" हें रूप भूतकालवाचक आहे तरी, त्याचा भाव आज्ञार्थ आहे हें उघड आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'नवरसामाझारिं शृंगारसा'

—रघुनाथ पंडित (नलदमयंतीस्वयंवर)

बळीराम येरकुंठवार

(लेखांक २ रा)

पतिपत्नींच्या रतिस्थायीभावांत मानवी अंतःकरणांतले कोणते कोमल, उत्कट व उदात्त भाव येत नाहीत ? 'शृङ्गारःशुचिरुज्ज्वलः' असें अमरकोशकार म्हणतो. कांही टीकाकारांच्या मताप्रमाणे शुचि व उज्ज्वल हे शृंगार शब्दाचे पर्यायवाची शब्द आहेत, तर कांही टीकाकारांच्या मतें तीं त्याचीं विशेषणें आहेत. ही गोष्ट दोन्हीहि पक्षांना मान्यच आहेसें दिसतें की, शृंगारांत शुचिता व उज्ज्वलता खास आहे. भरतानेहि आपल्या विवरणांत या दोन्हीहि विशेषणांचा मुद्दाम पुनःपुनः उल्लेख केला आहे. पितृप्रेमापेक्षा मातृप्रेमाची फार मोठी थोरवी गाईली जाते. 'जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसि' हें लक्ष्मणाचें वचन अगर श्री मायदेवांची आईवरील हलवून सोडणारी कविता यासारख्या मातृप्रेमाची सर्वंकषता प्रतिपादणाऱ्या साक्षी विपुल आहेत. परंतु तुकाराम महाराजांनी म्हटल्याप्रमाणे, 'माय पाळी संसारीं। परलोकीं राहे दूरी ॥' हेंहि कांही खोटें नाही. पतिपत्नी व मायलेक या दोन संबंधापैकी कोणत्या एका संबंधांत दोन जीवांचें ऐक्य व परिपूर्ति आढळून येते ? मानवी अंतःकरणाचें सर्वतोपरि तर्पण मायलेकाच्या संबंधांत होत नाही, तें पतिपत्नींच्याच संबंधांत होतें, हा माझा दुसरा महत्त्वाचा मुद्दा आहे. पुरुषाच्या सर्व वृत्ती व स्त्रीच्या सर्व वृत्ती याच संबंधांत प्रकट होतात, वाढतात आणि परिपूर्ण होतात. आणि म्हणूनच मीं मागे म्हटलें आहे की, रतिस्थायीभाव अष्टविध पैलू असलेला आहे. पति-पत्नींच्या रतिस्थायी भावांत काय आढळत नाही ? त्यांत प्रीतीबरोबरच भक्तीहि आहे आणि वात्सल्यहि आहे. क्रोध, भय, विस्मय, उत्साह, शोक, हास्य, जुगुप्सा इत्यादींबरोबरच शमहि आहे. त्यांत विलक्षण निष्ठाहि आहेच. सद्गुरु आणि सच्छिष्य या दोन जीवांचे आदिपासून अंतापर्यंत जसे संबंध तसेच पतिपत्नीचेहि संबंध आहेत. आणि म्हणूनच त्यांत आचार-विचारांच्या शिस्तीची निष्ठुरताहि आहे. मनुप्रभृति धर्मशास्त्रकारांनी पतिपत्नींच्या जीवनाचा हाच आदर्श जगासमोर मांडला आहे. त्यांत त्यांच्या परिपूर्ण प्रज्ञेचा साक्षात्कारच होतो. मातृ-प्रेमांत स्त्री-हृदयाचें सारें संतर्पण होतें का ? आपण पूर्वी हें पाहिलेंच आहे की, स्त्रीच्या प्रेमतृष्णेंत दोन विरोधी वृत्ती असतात. श्रीज्ञानेश्वरांनी आपल्या विरहिणींच्या अभंगांत म्हटल्याप्रमाणे प्रत्येक स्त्री-हृदय 'तुजमाजीं विरावें ! तुज गिळुनि राहावें' (श्रीज्ञानदेवांची गाथा, अभंग २१७) अशी तळमळ बाळगणारे असतें. 'तुजमाजी विरावें' ही त्या हृदयाची पतिनिष्ठ बाजू आहे व 'तुज गिळुनि राहावें' ही वत्सनिष्ठ बाजू आहे. आपल्या तान्हुल्यास उराशीं घेतांना 'त्याला खाऊं की गिळूं' अशी वृत्ति मातांमध्ये उसळतेच की नाही ? स्त्रीच्या मनांत पतीबद्दल अशीच उसळी जेव्हा उत्पन्न होते तेव्हा ती या मातृवात्सल्यांतूनच उत्पन्न झालेली असते. एका स्त्रीने हॅवलॉक एलिसला यासंबंधी एक मोठें सुंदर पत्र लिहिलें होतें 'Impulse of love to bite and devour' (Vol. 1, P. 88) बद्दल विवरण करतांना ख्रिस्ताने आपल्या आयुष्याच्या शेवटीं शिष्यांना जी मेजवानी दिली तिचें आकळलेलें गुह्य तिने उघड केलें आहे. ही मेजवानी 'Central sacrament of Christianity'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आहे ही गोष्ट जाहीर आहे. या प्रसंगानें ख्रिस्तानें आपलें दिव्य प्रेम प्रकट केलें आहे असें ती म्हणते. तिच्या प्रतिपादनांत जास्त न शिरतां आपल्यास म्हणतां येईल की, तिची प्रेमाची कल्पना योग्य आहे. परंतु निव्वळ मातृप्रेमाची तहान भागल्याने स्त्री खरी तृप्त होत नाही. पति वा अपत्य यांपैकी कोणातरी एकाकरितांच जीव देण्याचा प्रसंग आला तर स्त्री कोणाकरिता आत्मत्याग करील? ज्ञानेश्वरांच्या मातोश्रींचें उदाहरण ज्वलंत आहे. आपुलीं मुलें म्हणजे त्रिभुवनाचें सौभाग्य, ही ठाम प्रतीति असलेल्या रुक्मिणीबाईने विठ्ठलपंतांच्या बरोबरच प्रयाण केलें यांतच रति स्थायीभावाची शुचिता आहे व उज्ज्वलता आहे. आणि म्हणूनच भारतीयांनी, जगांत इतरत्र न आढळणारा, एक वेगळाच वैवाहिक आदर्श स्त्री-पुरुषांच्या पुढे ठेवलेला आहे. ऋग्वेदाच्या १० व्या मंडलांत 'सूर्याविवाहा'चें एक मोठें रमणीय व उद्बोधक सूक्त आलें आहे आणि आमच्या विवाहविधींत त्या सूक्ताचा विनियोगहि करण्यांत आलेला आहे. सूर्याबद्दल अनेक प्रेमपूर्वक मागण्या करितां करितां शेवटीं अशीहि मागणी करण्यांत आली आहे की, 'हे कामना पुरविणाऱ्या इंद्रा, हिला पुत्रवती व सौभाग्यवती कर. आणि हिचा पति हाच त्यानंतर अकरावा पुत्र शोभेल असें कर.' (इमां त्वं इन्द्रमीढ्वः सुपुत्रां सुभगां कृणु। दश अस्यां पुत्रान् आधेहि पतिं एकादशं कृधि ॥—१०, ८५, ४५) या ऋचेचा अर्थ पाश्चात्यांनी व त्यांच्या दत्तकपुत्रांनी 'दहा पुत्र व अकरा नवरे' असा केला आहे तो सहृदय खास नाही. वात्सल्यापेक्षा रति हा स्थायीभाव स्त्रीच्या हृदयाच्या दृष्टीने जसा अंतरतम आहे तसाच पुरुषाच्या दृष्टीने तो तसाच आहे याचें जास्त विवरण करून सांगण्याची गरज नाही. श्रीरामकृष्ण परमहंसांनी आपली पत्नी शारदादेवी हिची 'दुर्गा'-भावाने जी षोडशोपचार पूजा केली त्यांत पुरुषाच्या दृष्टीने सर्व उपदेशामृत साठविलें आहे. हा त्यांच्या भक्तिभावनेचा परिपाक होता. हा परिपाक रति या स्थायीभावांतूनच उदय पावलेला होता.

रति व भक्ति यांच्या स्वरूपाचा व परस्पर संबंधाचा उलगडा झाला म्हणजे शृंगाररस व भक्तिरस यांतील वादाचाहि निकाल लागतो. भक्तिभावाची चरमसीमा मधुरभाव ही आहे. मधुरभाव म्हणजे काय, त्याचें साधन' कसें करतात इ. गोष्टींची ज्यांना नीट कल्पना आहे त्यांना हा वाद निरर्थकच वाटतो. भक्तिरसाला स्वतंत्र प्रतिष्ठा देतांना डॉ. वाटव्यांनी या गोष्टीचा सखोल विचार केलेला दिसत नाही. भक्तिरसाबद्दलच्या मतामतांच्या गलबल्यांतून वाट काढण्याचा एकच उपाय त्यांना दिसतो. ते म्हणतात, "अशा परिस्थितींत मानसशास्त्राची कसोटी या प्रकरणीं लावून पाहाणें हा एकच मार्ग शिल्लक उरतो." (पृ० २५९) डॉ० वाटवे म्हणतात की पूर्वीचे साहित्य-शास्त्रज्ञ परंपरेच्या भाराखाली दबलेले असल्याने त्यांनी भक्तिरसास स्वतंत्र मान्यता दिलेली नाही'. परंतु, परंपरेच्या भाराखाली दबलेला नाही कोण? मॅक्स-मुल्लरची धर्मोत्पत्तीची कल्पना अन्ड्रयू लँगच्या जबरदस्त आघाताने कधीच मृत झाली असली तरी डॉ० वाटवे तिच्या भाराखाली अजूनहि दबलेलेच आहेत. ऋग्वेदांतल्या देवता निसर्गशक्तीच्या प्रतीक-रूप असून त्या भीतींतून निर्माण झालेल्या आहेत अशी जी थाप ते ठोकून देतात तेंहि पाश्चात्य 'परंपरा-रक्षणाचें अतिरिक्त दडपण'च आहे. मानवशास्त्रांतील (Anthropology) अद्यतन प्रगतीचा ज्यांना परिचय आहे त्यांना या मतांचा फोलपणा अधिक सांगावयास नकोच.

ज्या मानसशास्त्राच्या कसोटीने मार्ग काढण्याची आकांक्षा डॉ. वाटवे धरतात त्या मानसशास्त्राप्रमाणें रति व भक्ति यांचा परस्पर संबंध कसा आहे तो थोडक्यांत पाहूं. या दृष्टीने हॅवलॉक एलिसने 'the Auto-Erotic Factor in Religion' या प्रकरणांत जी अल्पशी चर्चा केली आहे ती विचारांत घेण्याजोगी आहे. त्याने "It is noteworthy and significant fact that the age of love is also the age of conversion." (Vol 1 P. 310) असें विधान करून त्यासंबंधी त्याने कांही पुरावा दिला आहे. तारुण्याच्या ज्या अवस्थेंत प्रेमभावनेचा उदय होतो त्याच अवस्थेंत धर्म-भावनेचा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उदय होऊन आयुष्यें पालटून गेल्याचीं अनेक उदाहरणें दिसतात. अनेक निरीक्षकांनी याबाबत दीर्घकाल सूक्ष्म अवलोकन करून, '...Wide recognition of this close affinity between the sexual and the religious emotions," असें निश्चित मत दिलें आहे. हॅवलॉक एलिसनें कांही ख्रिश्चन साधकांचा अनुभवहि दिला आहे. मॅक्डुगलने या बाबतींत खोल परिश्रम केलेले होते. त्यानेहि प्रेमभावना व धर्मभावना यांचा संबंध एलिसप्रमाणेच दाखविला आहे. कामप्रवृत्तीचें उदात्तीकरण (sublimation) 'सामान्य' व 'विशेष' अशा दोन्हीहि तऱ्हांनी कसें होतें हें दाखवून, तो 'विशेषा'बद्दल असें म्हणतो की, "The intensification of thought and feeling may affect principally the religious interests, and then becomes a main condition of the conversion which is so characteristic of adolescence." (Social Psychology, P. 363) मॅक्डुगल 'Sex instinct' व 'parental instinct' यांत जसा संबंध मानतो तसाच संबंध 'sentiment of sex-love' व 'religious sentiment' यांत असण्याचा संभव आहे. नोबेल पारितोषिक कमवून आधुनिक विज्ञानांत ऋषित्व संपादणाऱ्या व साधकांच्या जीवनाचा व त्यांच्या अतींद्रिय अनुभवांचा अतिशय संशोधनपूर्वक व प्रतीतिपूर्वक अभ्यास करणाऱ्या डॉ. कॅरेलचेंहि मत या दृष्टीने विचारांत घेण्याजोगें आहे. तो म्हणतो की, स्त्री-पुरुषांच्या ज्या लिङ्गविशिष्ट ग्रंथी (sex-glands) आहेत त्यांचा परिणाम माणसाच्या वळावर व मनोजातीवर होतो. त्यांच्यांत पालट झाला की, या गोष्टींतहि पालट होतो. "In general, great poets, artists, and saints, as well as conquerors, are stronagly sexed ......Inspiration seems to depend on a certain condition of sex glands.........the great mystics often used the expressions of Soloman's song......In order to reach its fall power, intelligence seems to require both the presence of well-developed sexual glands and the temporary repression of the sexual appetite." (Man, the unknown, P. 139-140) फ्राइडने महत्त्वाच्या तत्त्वाचें आकलन केलें होतें पण त्याचें सिद्धान्तीकरण (generalization) चूक होतें अशी टीका करून पुढे तो असेंहि म्हणतो की, "While the weak, nervous, and the unbalanced become more abnormal when their sexual appetites are repressed, the strong are rendered still stronger by practising such a form of ascetism" (Ibid, 140) सारांश, रतीचेंच रूपांतर भक्तींत कसें होतें, तिला श्रीमद्भागवताच्या आरंभीं म्हटल्याप्रमाणे 'निगमकल्पतरोर्गलितं फलं' असें स्वरूप कसें येतें, याचें एवढयावरून स्पष्टीकरण होईल. माझा हा तिसरा मुद्दा आहे.

सर्व भगवद्भक्तांच्या वाङ्मयाचा या दृष्टीने अभ्यास करण्याजोगा आहे. भगवद्भक्तीच्या स्निग्ध व सान्द्रभावाच्या उद्रेकांत जी भाषा प्रकट होते ती पतिपत्नीच्या संबंधांतीलच कां असते याचा बारीक विचार करण्याजोगा आहे. लौकिक दृष्टया पतिपत्नी या दोन जीवांत जसा अंतरतम संबंध असतो तसाच भक्त व भगवान् यांत असतो. दुसरी उपमाच येऊं शकत नाही. इतर सारी भाषा लटकीच पडते. कडकडीत ब्रह्मचर्य असलेल्या श्रीसमर्थांनी, 'हरीचिंतनीं मुक्ति कांता वरावी' असें म्हणावें अगर वैराग्याची धगधगीत मूर्ति असलेल्या श्रीतुकारामांनी 'तुका म्हणे मुक्ति परिणिली नोवरी' असें म्हणावें अगर भगवान् म्हणून गौरविल्या गेलेल्या रामकृष्ण परमहंसांनी, 'श्रीकृष्णाच्या नुसत्या दर्शनाने गोपींच्या मनांत कोटी रमणसुखाहूनहि अधिक आनंद होत असे······ (श्री. न. रा. परांजपेकृत चरित्र, भाग, १ ला. पृ० ३२७) असा सहज दृष्टांत द्यावा यांत निव्वळ योगायोग नाही. 'शृंगारिक माझीं नव्हतीं

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उत्तरें । आळवितो खरें अवस्थे या' ।। अगर 'करावेसें वाटे जीवा स्तनपान । नव्हे हें वचन शृंगारिका ।।' अशी तळमळ बाळगणारे श्रीतुकाराम प्रेमी जीवांच्याच भाषेंत आत्मकथन कां करतात ? डॉ. कॅरेलनेहि हें गुह्य ओळखलें होतें आणि म्हणूनच तोहि म्हणतो की, "He is not capable of describing his experiences. When he attempts to express what he feels, he sometimes borrows, as did St. John of the Cross, the language of carnal love." (Man the unknown, P. 133) रति या स्थायी-भावाच्या परमउन्नत आविष्कारांतूनच भक्तिभावाचें फल उत्पन्न होतें या तत्त्वांचीच ग्वाही या साऱ्यांतून आपणांस मिळते. ही गोष्ट लक्षांत न घेतल्यामुळेच संतवाङ्मयांतील कांही भागाबद्दल गैरसमज झाला आहे व कांही बाबतींतला परवाना समजून त्यांचा दुरुपयोगहि करण्यांत आला आहे.

भक्तिभावाचा अंतिम परिपाक जी मधुरा भक्ति तिचें स्वरूप पतिपत्नींच्याच संबंधासारखें आहे. परमेश्वर आपला प्रियतम पति व आपण त्याची प्रिया अशा भावानेच तें साधन करावयाचें असतें. या मधुरा भक्तीचा अत्यंत उत्कट व अनुपम आविष्कार प्रथमत: जो झाला तो वृंदावनांतील गोपींच्या चरित्रांत झाला. डॉ. वाटवे गोपींबद्दल म्हणतात, "कृष्ण परमात्मा आहे हें ज्ञान जर त्यांना नसतें तर तें जारप्रेम झालें असतें." (पृ. १६३) पण हें त्यांचें विधान सपशेल खोटें आहे. शृंगार-रसाहून भक्तिरस निराळा आहे या प्रतिपादनाच्या अभिनिवेशांत त्यांनी वस्तुस्थिति अगदी नजरेआड केली आहे. गोपींच्या भक्तीबद्दल बोलण्याचा अधिकार भागवत-पुराणा इतका दुसऱ्या कोणाचा असेल ? या पुराणानें अथपासून इतिपर्यंत गोपींबद्दल एकच एक सांगितलें आहे की, त्या कृष्णाबद्दलच्या अनन्य व अनुपम्य रतिभावानेंच उद्धरून गेल्या. 'कामात् गोप्य:' असें त्यानें पुन:पुन: सांगितलें आहे. आणि तोहि काम जारबुद्धीचा होता हेंहि धडधडीत सांगितलें आहे. शुकाचार्यांना परिक्षितीनेंहि असा प्रश्न विचारला आहे की, 'परमात्म बुद्धीनें नव्हे, आपला अत्यंत आवडता प्रिय या बुद्धीनेंच गोपी कृष्णाशीं रत झाल्या. असें असूनहि त्या त्रिगुणातीत कशा झाल्या ?' (कृष्णं विदु: परं कान्तं न तु ब्रह्मतया मुने । गुण प्रवाहो परमः तासां गुणप्रिय: कथम् ।।') श्रीकृष्णानें त्यांच्याशीं जो लीला केली तीहि शृंगाराचीच होती. आलिङ्गन, चुम्बन, दशन, नखच्छेदन, इ० नी 'उत्तम्भयन् रतिपति रमयांचकार' अशीच होती. आणि रासक्रीडेच्या शेवटीं परिक्षितीनें, स्वत:च्या गोंधळलेल्या मनाचें समाधान करण्याची मागणी करणारा, पुन: जो प्रश्न विचारला आहे त्यांतहि रति स्थायीभावाचाच खुंटा हालवून बळकट केला आहे.

श्रीज्ञानेश्वरांचे विरहिणीचे अभंग व 'अंबुल्या'चे अभंग व श्रीतुकाराम-महाराजांचे 'विराण्याचे' अभंग यांत त्यांच्या मधुरभावाच्या साधनाचें स्पष्ट प्रतिबिंब उमटलें आहे. श्रीज्ञानेश्वर म्हणतात, 'मदनें जाकळिलें,' 'कांचोळी अंगीं न समावे' आणि श्रीतुकाराम महाराज म्हणतात 'आविल्या भ्रतारें काम नव्हे पुरा । म्हणोनि व्यभिचारा टेकलीये ।।,' 'रातलें अनंता चित्त माझें' अलिकडच्या काळांत या भावाचें साधन करणाऱ्या रामकृष्ण-परमहंसांनी तर या बाबत जास्त उलगडा केला आहे. त्यांच्या मराठी अधिकृत चरित्रानें या भावाची मोठी सुंदर मीमांसा केली आहे. रामकृष्णांनी ज्यावेळीं मधुरसाधन केलें त्यावेळीं ते स्त्रीवेषांतच राहात असत. राधाभावांत असतांना स्त्रीवेषासाठी लागणारे सर्व जिन्नस व दागिने सुद्धा मथुरनें आणून दिले होते. सहा महिनेपर्यंत त्यांनी स्त्रीवेष धारण केला होता. या काळांत त्यांचें बोलणें, चालणें, हसणें, पाहाणें, हावभाव आणि शारीरिक व मानसिक सर्व व्यवहार अगदी थेट स्त्रियांच्या सारखे होत.

रति स्थायीभावाचा परमोत्कर्ष झाल्याशिवाय या गोष्टी संभवत नाहीत हें सहृदय वाचकांच्या लक्षांत येऊं शकेल. डॉ. वाटव्यांनी या भक्तीला शृंगारभक्ति हें नांव दिलें आहे व त्याबद्दल कांही शेराहि मारला आहे. तो मारतांना ते असें म्हणतात की, "राधा व दुर्गा या देवतांची पूजा सुरू होऊन कांही भक्त तर स्त्री-वेषांत राहून स्त्रियांचे सर्वच व्यवहार पाळूं लागले !" (पृ. २८०) पण असें विधान करतांना

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रामकृष्णांसारख्या भावसम्राट भगवद्भक्तांना आपण किती हीन लेखतों याची त्यांना शंकाहि आली नाही ! असो.

पतिपत्नींच्या रतिस्थायीभावाच्या वाढींत शांत, दास्य, सख्य, वात्सल्य व मधुर अशा अवस्था असतात, तशाच भक्तिभावाच्या वाढींत असतात. त्याचप्रमाणे सात्त्विक भाव ज्याप्रमाणे शृंगारांत असतात तसेच भक्तिभावांतहि असतात. डॉ. वाटव्यांनी सात्त्विक भावाबद्दल जें विवेचन केलें आहे तें बरोबर कसें नाही याची मीमांसा, 'भरतमुनींची व्युत्पन्न निंदा' या माझ्या लेखांत केलीच आहे. सात्त्विक भाव हे मानस आहेत, निव्वळ शारीरिक नाहीत व ते रति स्थायीभावांतच अनुभवास येतात ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे रति व भक्ति यांतील मानीव अंतर आपोआपच मिटून जातें. एकट्या याच भावांत असें सामर्थ्य आहे की, तो मानवांत 'सत्त्व' नांवाचा भाव–मानसात्मक एक वेगळा देह उत्पन्न करूं शकतो.

भरताने भक्तिरस वेगळा का मानला नाही याबद्दल डॉ. वाटवे असा तर्क करतात की, "त्याचे काळीं कदाचित् रसपदवीस पोचेल इतकें भक्तिरसपर वाङ्मय नसावें; अथवा असलेंच तर तें उत्कट कोटीला पोचणारें नसावें." (पृ. २९३) 'श्रुतिबोध' कारांनी चांगलें दाखविल्याप्रमाणे ऋग्वेदकाळींच वैदिक लोकांत उत्कट भक्ति होती. भरताच्या काळींहि भक्तिमार्ग चांगलाच रूढ झाला होता, ही गोष्ट इतिहासज्ञांना चांगली परिचित आहे. अशा सुप्रतिष्ठित मार्गाचें वाङ्मयहि त्यावेळीं असलें पाहिजे हेंहि उघड आहे. भरताचा काळ यापुढचा आहे. खुद्द नाट्यशास्त्रांतील भक्तिपर अनेक उल्लेख यादृष्टीने पहाण्याजोगे आहेत. डॉ. वाटव्यांनी इथेहि आत्मविसंगति दाखविली आहे. पृ. २९७–२९८ वर तेच स्वतः या मताचें खंडन करीत आहेत ! भरतकाळीं एवढ्या रूढ झालेल्या भक्तिमार्गाच्या वाङ्मयावरून त्याने भक्तिरसाची स्वतंत्र गणना करावयास हवी होती. परंतु तो ती करीत नाही यांतच स्वारस्य आहे असें मला वाटतें. भक्तीचें रहस्य आकलन झाल्यामुळेच त्याने भक्तिरसाला रतीहून वेगळें केलें नसावें, हेंच उघड आहे. शास्त्रीय पद्धतीने विचार केल्याचाच तो परिणाम आहे असें मला वाटतें. भरताच्या भूमिकेचा आम्हांस एकतर विसर तरी पडतो अगर त्यासंबंधी यथायोग्य ज्ञान तरी आम्हांस नसतें असें म्हणावेसें वाटतें. अभिनवगुप्ताने स्थायी भावांच्या निश्चितींत ज्या इतर कसोटी दिल्या आहेत त्यांत 'पुमर्थोपयोगित्व' हीहि एक कसोटी आहे. त्या कसोटीस डॉ. वाटवे, "......ही साहित्यशास्त्रकारांची कसोटी निव्वळ धार्मिक असल्याने तिचा विचार फारसा करण्याची आवश्यकता नाही." (पृ. २४७) असें हिडीसफिडीस करून रसमीमांसेंतून हद्दपार करतात. आणि पुढे अशी कोटीहि करतात की, 'भक्ती'सारख्या उत्तम मोक्षसाधनाला रसपदवी नाकारणाऱ्या संस्कृत साहित्यकारांना पुमर्थोपयोगित्वाची कितीशी चाड होती हें दिसतेंच आहे." (पृ. २४७) साहित्यशास्त्रास धार्मिकतेचा जर एवढा विटाळ आहे तर त्याने भक्तिरसास, की ज्यांत धार्मिकतेशिवाय दुसरें कांहीहि नाही, त्यास स्वतंत्र स्थान लाभून देण्याचा व्यर्थ खटाटोप कां करावा ? भरताची भूमिका अशीच होती काय ? आधुनिक मानसशास्त्र तरी इतकें सोवळें आहे काय ? मॅक्डुगलचें मानसशास्त्र ही अस्पृश्यता झुगारून देणारें निश्चित आहे.

भरताची व सर्व संस्कृत साहित्यकारांची भूमिका काय होती याबाबत एका प्रबुद्ध मताचा मी उल्लेख करूं इच्छितों. योगशास्त्राबद्दल बोलण्याचा, इतर कोणाहि तज्ज्ञापेक्षा खास कमी अधिकार नसलेल्या एका सुप्रसिद्ध विद्वानाने (श्री. अप्रबुद्ध यांचा 'The Science of Yoga Vol. I पहा) आपल्या दुसऱ्या एका पुस्तकांत प्रतिपादनाच्या ओघांत असें म्हटलें आहे की, "आमचें साहित्यशास्त्र आणि ललितकला यांचा भावयोगाशीं दृढ संबंध आहे. किंबहुना असेंहि म्हणतां येईल की, संगीत, साहित्य आणि निरनिराळ्या कला यांना विशिष्ट वळण लागून त्यांचे शास्त्रोक्त नियम ठरले गेले तेच मुळीं भावयोगाच्या माह्याने ठरले गेले." (भारतीय विवाहशास्त्र, भा. १, लेखांक ७, पृ ६–७) हें सर्वच प्रतिपादन अत्यंत वेधक व चिंतनीय आहे. मला वाटतें, भरताच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

व संस्कृत साहित्यकारांच्या भूमिकेचें अंतरंग समजावून घेतांना या त्यांच्या सूचनेचा गंभीर विचार केला पाहिजे. तसा तो केला म्हणजे रस–स्वरूप, रससंख्या इ. विवाद्य प्रश्नांवर चांगला प्रकाश पडेल. गतवर्षीच्या ऑगस्ट महिन्यांत 'विदर्भ साहित्य संघा'तर्फे डॉ. वाळिंब्यांचीं प्राचीन नाटचदृष्टीवर दोन सुश्राव्य व विद्वत्ताप्रचुर व्याख्यानें झालीं. त्यांपैकी दुसऱ्या व्याख्यानांत वेगळ्या भाषेंत व वेगळ्या मांडणीने, श्री. अप्रबुद्धांचेंच म्हणणें डॉ. साहेबांनी मांडलें होतें. प्राचीनांच्या सांस्कृतिक कल्पनांनुसार त्या काळची नाटचसृष्टि होती असें म्हटलें की, आधुनिक कसोटींनी तिचें मूल्यमापन करणें अशास्त्रीय आहे हें आपोआपच सिद्ध होतें. आणि प्राचीन दृष्टीची ही विशेषता व भिन्नता लक्षांत घेतली म्हणजे नाटचादि कलाकृती करमणुकीकरितां होत्या असेंहि म्हणणें आत्मविसंगतच कसें होतें हेंहि आपोआपच सिद्ध होतें. भावयोगाचें ध्येय आनंदात्मक संप्रज्ञात समाधियोग हें आहे व या योगांत आनंद हीच बाब प्रमुख असल्यामुळे, आनंद संपादन करून देणाऱ्या या अर्थानेच आमच्याकडील काव्यकला करमणूक करणाऱ्या आहेत. मूळ सांस्कृतिक भूमिकेनुसार डॉ. वाळिंबे म्हणतात त्याप्रमाणे निव्वळ 'entertainment' या अर्थानें त्या संभवूंच शकत नाहीत.

मला वाटतें की, ही लेखमाला मर्यादेबाहेर लांबल्यामुळे अधिक विवेचन न करणें बरें. मुख्य मुख्य मुद्यांची यथाशक्य स्पष्ट व निश्चित दिग्दर्शन होण्यापुरती शहानिशा मी केली आहे. आणखीहि कांही मुद्दे विचारांत घेण्याजोगे आहेत. उदा० भरताने, "श्यामो भवति शृङ्गारः' असें कां म्हटलें याचा बारीक विचार करण्याजोगा आहे. डॉ वाटव्यांनी 'श्याम' याचा अर्थ 'जांभळा' (पृ. ४०९) केलेला आहे तो बरोबर आहे असें जरी धरलें तरीहि या मुद्याचें महत्व कांही कमी होत नाही. परंतु स्थलाभावास्तव या व अशाच इतर मुद्यांना मी सोडून देत आहें.

शेवटीं एका नाजुक महत्वाच्या गोष्टीबद्दल खुलासा केल्याशिवाय हें लांबलेलें चऱ्हाट संपवूं नये असें मला मनापासून वाटतें. ही गोष्ट म्हणजे या लेखमालेंत डॉ. वाटव्यांवर मी टीकेचा भडिमार केल्यासारखें जें दिसतें तो होय. मी हें स्पष्ट कबूल करितों की, तसें करण्यांत माझा स्वार्थच होता. एक तर असें की, विषयाचें ठीक प्रतिपादन होऊन त्याची नीटनेटकी गुंफण होण्याकरिता पुढे निमित्ताला कोणता ना कोणता तरी भारदस्त ग्रंथ घ्यावा लागतो, हें सर्व विद्वानांना सांगावयास नकोच. आणि दुसरें असें की, रसव्यवस्थेबद्दल व्यापक चर्चा करणारा अगदी अलिकडचा एक मोठा प्रमाणग्रंथ या दृष्टीने त्यांचा 'रस–विमर्श' प्रसिद्ध असल्यामुळे खुद्द त्यांच्याशींच झुंज घेण्यांत मलाच अधिक लाभ होण्याची मी संधि साधली. त्या निमित्ताने त्यांचें व इतर विद्वानांचें लक्ष वेधलें जाऊन जें तुंबळ रण माजण्याचा संभव आहे त्यांतून मला शिकण्यासारखें पुष्कळ निघेल अशी मला आशा वाटते. नाही तर एरव्ही मला कोणी शिकविलें असतें ! माझ्या प्रतिपादनाचा विद्वान साहित्यिकांनी विचार करावा एवढीच माझी नम्र प्रार्थना आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ग्रंथ समालोचन

हरिवरदा

(प्रकाशक : दयार्णव कोपर्डेकर, पुणें; किंमत ६ रुपये)

भागवत पुराण हा भक्तिसांप्रदायाचा आधारग्रंथ असल्यामुळे इतर पुराणांपेक्षा साहजिकच या ग्रंथास धर्मग्रंथाचें माहात्म्य लाभलें आहे; एवढेंच नव्हे, तर त्यांतील श्लोकांना मंत्रत्व आलें असून कित्येकदा वैदिक स्वाहाकाराप्रमाणे भागवत स्वाहाकारहि होतात. भागवतास धर्मग्रंथ म्हणून जसें स्थान लाभलें आहे तसेंच तो विद्वानांच्या विद्वत्तेची परीक्षा पाहणारा ग्रंथ म्हणूनहि विद्वानांत मान्यता पावला आहे. 'विद्यावतां भागवते परीक्षा' हें सुभाषित पंडितांत प्रसिद्धच आहे. भागवत पुराणास अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालें असलें तरी त्यांतल्या त्यांत दशम व एकादशस्कंध हे भक्तिमार्गीयांना अत्यंत जिव्हाळ्याचे वाटत असल्यामुळे ह्या दोन स्कंधांवर जितक्या टीका झालेल्या आहेत तितक्या इतर स्कंधांवर नाहीत.

महाराष्ट्रांत भक्तिमार्गाचा उदय झाल्यापासून मराठी संतकवींनी ह्या दोन स्कंधांवर पुष्कळच टीका लिहिल्या. एकादश स्कंधावरील सर्वांत जुनी मराठी टीका भास्करभट्ट बोरीकराची उद्धवगीता. त्यानंतर सर्वमान्य व लोकप्रिय टीका म्हणजे नाथांचें एकनाथी भागवत. दशमस्कंधावर श्रीधर, वहिरा, जातवेद, शिवकल्याण, लोलिंवराज व कृष्णदयार्णव इत्यादि कवींनी टीका केल्या आहेत. ह्या सर्व टीका भागवताच्या दशम व एकादश स्कंधावर असल्या तरी त्या भाषांतरें नव्हत. ह्यांपैकी प्रत्येक टीकेंत टीकाकाराने आपलें विवेचनस्वातंत्र्य व प्रतिभेचा विलास प्रकट केला आहे. यामुळे या ग्रंथांना स्वतंत्र व मौलिक ग्रंथरचनेइतकें महत्व आलें आहे. ह्या टीकांतून जशी प्रमेयरत्नांची गुंफण आढळते तसाच भावाचा फुलोर फुललेला आढळतो, कल्पनांच्या रम्यत्वाबरोबरच वर्णनाचा रसाळपणाहि दिसून येतो, शब्दसंपत्तीच्या बाबतींत तर ह्या टीका सार्थ, समर्पक व सुंदर शब्दांचे रत्नाकर आहेत.

मराठी सारस्वतांत शब्दसृष्टीच्या ईश्वरांनी साहित्याचे हे अमोल रत्नाकर निर्माण केले असले तरी आजच्या मराठी रसिकांकडून मात्र त्यांची उपेक्षा होत आहे. आज भाराभर व भराभर लघुकथा, कादंबऱ्या व काव्यसंग्रह प्रसिद्ध होत असले तरी ज्या काव्यांना व टीकाग्रंथांना अक्षरवाङ्मय म्हणतां येईल अशीं हीं प्राचीन काव्यें कित्येक ठिकाणीं धूळ खात पडलेलीं आहेत, कित्येक नष्ट होत आहेत, तर कित्येक प्रकाशांत येण्याकरिता प्रकाशकांची वाट पहात आहेत व कांही काव्यें जीं एकदा मुद्रित झालेलीं होतीं तीं आज पुनर्मुद्रणाची वाट पाहत आहेत.

संतकवि कृष्णदयार्णवांची हरिवरदा ही टीका बऱ्याच वर्षांपूर्वी पोथीच्या रूपांत प्रसिद्ध झाली होती. परंतु आज तो ग्रंथ दुर्मिळ झाल्यामुळे पुनर्मुद्रणाची आवश्यकता होती. तथापि मराठी वाचकांची आजची अभिरुचि लक्षांत घेतां पुनः प्रकाशनाची इच्छा असूनहि कोणताहि प्रकाशक आज तयार झाला नसता. अशा परिस्थितींत श्री. कोपर्डेकर यांनी साहस करून हरिवरदा या ग्रंथाच्या पुनः प्रकाशनाचें कार्य हातीं घेतलें यावद्दल त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. हरिवरदा या ग्रंथाचा हा प्रथम खंडच प्रसिद्ध होत आहे. रा. कोपर्डेकर यांच्या प्रकाशनकार्यास मराठी वाचकांनी सार्थ हातभार लावला व विद्यापीठांनी वर्षानुवर्षे तींच तीं ठराविक पुस्तकें अभ्यासक्रमांत नेमण्यापेक्षा हरिवरदा ह्या ग्रंथासारखे ग्रंथ नेमून जर प्रकाशकांना उत्तेजन

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दिलें तर महाराष्ट्र साहित्याच्या अज्ञात दालनांतील बरीच अमोल ग्रंथसंपत्ति प्रकाशांत येईल.

संतकवि कृष्णदयार्णवाच्या हरिवरदा या ग्रंथाची नवीन आवृत्ति प्रसिद्ध होण्याचा योग आज ६१ वर्षांनी येत आहे. इ. स. १८९१ मध्ये प्रस्तुत ग्रंथ हरिवरदा छापखान्यांत छापण्यांत आला होता. त्यावेळीं जी हस्तलिखित प्रत उपलब्ध झाली होती तिच्यावरून ग्रंथ छापल्यामुळे त्यांत अर्थाच्या दृष्टीने वरेच अपपाठ होते. प्रस्तुत प्रत कृष्णदयार्णवाच्या मठांतील हस्तलिखित प्रतीशीं ताडून पाहून योग्य ते पाठ दिल्यामुळें अभ्यासकांना ही प्रत उपयुक्त झाली आहे. प्रस्तुत खंडाचें संपादन रा. शंकर नरहर जोशी यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक केलें असून ह्या आवृत्तींत कृष्णदयार्णवाचें चरित्र व विवेचक प्रस्तावना लिहिल्यामुळे तर ग्रंथाची उपयुक्तता विशेषच वाढली आहे. तरी यापुढील हरिवरदा या ग्रंथाचे पुढील खंड प्रसिद्ध करण्यास संपादक व प्रकाशक यांना उत्तेजन मिळावें म्हणून, मराठी भाषाभिन्यांनी या ग्रंथाचा संग्रह करणें उचित आहे.

—शं. गो. च.

ग्रामगीता

श्री. संत तुकडोजी महाराजांच्या ‘ग्रामगीता’ ह्या ग्रंथावर अभिप्राय लिहिण्याचें काम फार अवघड आहे. कारण ह्या ग्रंथाच्या प्रकाशनाच्या निमित्ताने वेगवेगळ्या विद्वानांनी ह्या ग्रंथाच्या मोलाचे वेगवेगळे पैलू प्रकाशांत आणलेले आहेत. शिवाय ह्या ग्रंथाची महत्ताहि स्वयंभू आहे.

ग्रामगीतेची प्रेरणा सेवावृत्तींतून आणि सर्वोदयाच्या आशेंतून झालेली आहे. त्यामुळे काव्याला आवश्यक वाटणाऱ्या प्रतिभेचा तसा विलास येथें दिसणार नाही. विलासाला कोंवळिक आवश्यक असते. परिणतप्रौढता विलासाला अपकारक ठरते. आमच्या म्हणण्याचा आशय असा की येथे जी प्रतिभा दिसते ती परिणतप्रज्ञाची दिसते. ती प्रौढ आहे, ती आढय आहे; पण तिच्यांत प्रौढी नाही की आडपडदा नाही.

ग्रामगीता ग्रामीणांसाठी आहे, ग्रामसेवकांसाठी आहे. ग्रामोद्धार तिचें ध्येय आहे, तिचा जन्मच मुळी खेड्यांसाठी आणि खेडुतांसाठी आहे. तेव्हा ती सुगम आहे आणि साध्या बाळबोध वळणाची आहे. तिने अलंकार परिधान केले आहेत, पण घरंदाज प्रौढेला साजतील असे.

ग्रामोद्धाराचा प्रयत्न करणारे अनेक आहेत. त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल शंका नाही. पण रोगाचें निश्चित निदान न करतां उपचार करूं धजणाऱ्या सारखे त्यांचे बव्हंश प्रयत्न व्यर्थ जात असतात. श्री संत तुकडोजींना जनपदाची आणि जानपदाची नाडी अचूक ओळखतां आलेली आहे व निदान निश्चित होऊन उपचार, अनुपान, पथ्य, परिचर्या त्यांनी अचूक हेरली आहे व तोच संपूर्ण पाठ ह्या ग्रंथांत नमूद केला आहे. म्हणूनच ग्रामसेवा करून आदर्श ग्राम उभविण्याची ज्यांची आकांक्षा, त्यांना हा ग्रंथ निश्चित मार्गदर्शन करणार आहे. या मोहांतून मुक्त करणारा, भ्रान्तचित्तता बाजूला सारणारा म्हणून भगवद्गीता ग्रंथ इतका प्रसिद्ध झाला की तो तो धर्म ज्या ज्या ठायीं ती ती गीता ह्या दृष्टीने ग्रामगीता सार्थनाम आहे.

हा ग्रंथ वाचून हातावेगळा होणाऱ्यापैकी नाही. हा नित्यपठनाचा ग्रंथ आहे. म्हणूनच तो धावत्या ओवींत रचला आहे. एकाने पठन करावें व अनेकांनी श्रवण करावें अशा वर्गातला हा ग्रंथ आहे. ग्रामीण निरक्षर असतात, म्हणून साक्षराने त्यांचें नेतृत्व घेऊन हा वाचून दाखवावा असा प्रकार ह्या ग्रंथाचा होईल म्हणून नव्हे; तर कित्येक विचार, कितीक आशय असे असतात की सामूहिक मनालाच ते झटकन् आकळतात. सामूहिक हृदयांतच त्यांचें संवाहन सुलभतेनें होतें. अशा प्रकारचा हा ग्रंथ आहे.

ह्या ग्रंथांत साधे विचार साध्या भाषेंत साध्या अलंकारांसमवेत मांडले आहेत. वानगीदाखल कांही उदाहरणें द्यावींत तर तें शक्य नाही. कारण हा गुण ह्या ग्रंथांत एकरूपतेने सर्वत्र प्रसृत झालेला आहे. साधीं उदाहरणें, साधे दाखले, साधे संदर्भ. पण त्यामुळे एक लहानसा दोष निर्माण झाला आहे. एका ठिकाणी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'दुसऱ्याचे जोडेंच पुसायचे तर बाटा कंपनींत नोकरी धरलेली काय वाईट' असा कांहीसा उल्लेख आहे. आज बाटा कंपनी अस्तित्वांत आहे. म्हणून हा उल्लेख सगळ्यांना समजेल. पण उद्या 'बाटा'चा अर्थ चटदिशीं कळेल की नाही कोण जाणे. कारण बाटा कंपनी-पेक्षा हा ग्रंथ दीर्घजीवी होणार आहे. किंबहुना आपण असें म्हणूं की समकालीन वाङ्मयापैकी जें कांही पुढच्या शतकांतहि जिवंत राहणार आहे त्यांत ग्रामगीतेचें स्थान निश्चित आहे.

जें वाङ्मय माणसाच्या हृदयांतील सद्वृत्ति जागृत करून त्याच्या शुचितेचा आस्वाद देतें आणि हृदयाचें शोधन करून विचार निर्मळ करतें तेंच दीर्घ-जीवी होतें. क्षुद्र वृत्तींना चाळवून क्षणभर नशा आण-णारें वाङ्मय झटकन् लोकप्रियता पावत असलें तरी तें टिकाऊ होत नाही. ज्या लावण्याहि आजवर टिकून आहेत त्यांत शृंगाराइतकीच आर्तताहि आहे हें ध्यानीं घेतलें पाहिजे.

म्हणूनच हा ग्रंथ अक्षर वाङ्मयांत समाविष्ट झाल्याशिवाय रहाणार नाही. ह्या ग्रंथाला वानलें पाहिजे असें नाही. सद्गुणाच्या प्रसूतीला स्तुतीची गरज नसते. पण ग्रंथाची आम्ही जी नांवाजणी करतों ती त्याच्या महत्तेच्या प्रतिपादनासाठी नव्हे, तर त्याच्या वाचनाच्या वेळीं आम्हाला जो आनंद लाभला त्या बद्दलचे आमचे धन्यवाद नमूद करायला !

म. ना. प.

कै. बा. सी. मर्ढेकर

मर्ढेकरांच्या मृत्यूमुळे एक प्रतिभासंपन्न व्यासंगी गृहस्थ नाहीसा झाला आहे. त्यांचें काव्य परंपरा आणि प्रयोग ह्यांचें रसायन होऊन प्रकट झालें. तें कुणास हलाहलवत वाटलें तर कुणी वीष हाहि एक उतारा असतो हें समजून त्याचें स्वागत केलें. स्वतःच्या अंतर्मनांतील नित्याचें द्वंद्व मर्ढेकरांनी आपल्या लेखनां-तून प्रकट केलें आणि इष्ट की अनिष्ट, नित्य की अनित्य, स्वाधीन की पराधीन ह्या जीवनांतील कूटांचा भेद घेण्याचा कसोशीने प्रयत्न केला. ह्या त्यांच्या प्रयत्नांत प्रत्यवाद कांही थोडे आले नाहीत. निंदा आणि असहिष्णुता ह्यांचा तर वर्षावच झाला. अबोल आणि अंतर्मुख (introvert) अशा मर्ढेकरांच्या मनःप्रवृत्तींवर त्याचा परिणाम झालाच असला पाहिजे. उपरोधाचें हत्यार वेलाग परजण्याचें त्यांचें सामर्थ्य एरव्ही प्रकट झालें नसतें. त्यांच्या लेखनांत कोणती तरी एक 'तिडिक' असे. केवळ रंजनासाठीं लेखन न करणाऱ्यांमध्ये मर्ढेकरांचें स्थान उच्चच राहिलें आणि अजून फार काळ तें तसें राहील ह्यांत शंका नाही. मराठी साहित्य अशा साक्षेपी विचारवंताला नित्या-करितां मुकलें ही फार मोठी हानि झाली आहे. त्यांच्या अनपेक्षित मृत्यूमुळे दुःखाची तीव्रता विशेषच वाटते.

किमया—

येतांना वळणावरूनी
मज कधीतरी तूं दिसला
मी नजर स्थिरावि तोंच
तूं वळणाआडचि गेला.

वाटलें जाहलें कांही
तें उमगुन आलें नाही
मज भरल्या गर्दीमाजी
भासलें रिक्तेपण कांही

एकदाच लिंबाखाली
थबकुनिया हळुच म्हणाला
डोळ्यांतील शैशव हसलें
"मत देशील कां तूं मजला ?"

त्या नजरेमधलें पाणी
शोधीत कुणा तरी होतें
प्राशुनी मृगाच्या लाटा
तें डहूळलेलें भासें

झुलूपांतून भालप्रदेशा
तूं उगाच लपवित होता
तव अंतर ओळख पटली
ती तुझ्यांत माझी मजला

पाण्याला ओढच भारी
ही तुझीच सारी किमया
फेसाळ दर्या गातो
ही तुझीच माझी दुनिया

वामन इंगळे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पत्रव्यवहार

प्रिय भाऊसाहेब पंडित यांस,

स. न. आज सकाळीं 'युगवाणी'चा ताजा अंक (मार्च १९५६) माझ्या हातीं पडला. त्यांतील आपलें 'संपादकीय' मी नेहमीप्रमाणें उत्सुकतेनें वाचावयाला सुरुवात केली. त्यांत विद्वद्रत्न कै. डॉ. भाऊजी दप्तरी यांच्या मृत्यूसंबंधी लिहितांना आपण अशीं विधानें केलीं आहेत कीं, "आमच्या विदर्भ साहित्य संघाचीच गोष्ट घ्या ना. घटनेमधे सन्मान्य सभासद करून घेण्याची सोय असतांहि ते विदर्भ साहित्य संघाचे सभासद नव्हते. निवडणुकींत आपल्याला मतें देतील असे खात्रीचे मतदार नोंदणी करण्यांत गर्क असणारांना ही कल्पना सुचली नाही तर नाहीच, पण वर्षानुवर्षं कोणत्या उमेदवारांना मतें दिलीं तर विदर्भ साहित्याचें पुरःसरण होईल त्यासंबंधी पत्रद्वारेंहि उपदेशात्मक पाठ सामान्य सदस्यांना देणाऱ्या श्रेष्ठींनाहि ही कल्पना सुचली नाही, हें मोठें नवल होय." आपलीं हीं विधानें वाचून मला अतिशय विस्मय आणि खेद वाटला.

कारण हीं विधानें उघड उघड अज्ञानानें केलेलीं असलीं, तरी 'श्रेष्ठी' म्हणून ज्यांचा आपण उल्लेख केलेला आहे, त्यांना तीं धादांत अन्याय करणारीं आहेत.

या बाबतींत वस्तुस्थिति अशी आहे कीं, मी स्वतः दोन वेळां कै. डॉ. भाऊजी दप्तरी यांना मुद्दाम त्यांच्या घरीं भेटून विदर्भ साहित्य संघाचे सदस्य होण्याबद्दल आणि त्याच्या संमेलनाचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याबद्दलहि विनंती केलेली होती. यांपैकी पहिल्या वेळीं श्री. ए. श्री. पटवर्धन हे माझ्याबरोबर होते आणि दुसऱ्या वेळी कै. हरिभाऊ नेने हे होते. पहिल्या खेपेस मी ज्या वेळीं त्यांना सदस्य होण्याबद्दल विनंती केली, त्या वेळीं ते मला हसून म्हणाले, "मला कशाला सभासद व्हायला आग्रह करतां तुम्ही? मी कांही तात्यासाहेब कोल्हटकरांसारखा साहित्यिक नाहीं आणि साहित्याविषयी मला विशेष रुचीहि नाही. माझा उपयोग तुम्हांला काय होणार आहे? मी आहों तेथेंच बरा आहों." यावर मी त्यांना विचारलें, "समजा, आपली वर्गणी कोणी भरली आणि आपल्याला सभासद करून घेतलें, तर आपण काय कराल?" त्यावर ते म्हणाले, "माझ्या सहीशिवाय तुम्ही सभासद कसा करणार मला? वर्गणी तर मी आताच देऊं शकतों. पण, विदर्भ साहित्य संघांत माझें कांही काम नाही, असें मला वाटतें, म्हणून मी नाही म्हटलें. केवळ तीन रुपये देण्याचाच प्रश्न असता, तर मी तुम्हांला नकार दिला नसता."

यानंतर मी सरचिटणीस असतांना वार्षिक निवडणुकीच्या आधी कै. हरिभाऊ नेने यांच्यासह मी त्यांना भेटावयाला गेलों होतों. त्याहि वेळीं मी पुन्हा वरीलप्रमाणेच विनंती त्यांना केली; व आग्रहाने असें म्हटलें की, "आपण जर सभासद झालांत तर आम्हांला आपल्याला अध्यक्ष निवडतां येईल. म्हणून आज मुद्दाम आम्ही दोघे आपल्याकडे विनंती करावयाला आलों आहोंत." त्याहि वेळीं त्यांनी नकार दिला. त्यानंतर आम्ही दोघांनी उद्घाटनासंबंधी त्यांना विनंती केली. तिलाहि त्यांनी नकार दिला.

कुलगुरु न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ति आणि श्री. पु. य. देशपांडे या दोघांनाहि कै. डॉ. भाऊजी दप्तरी यांच्याकडे आम्ही अशा प्रकारची विनंती करावयाला गेलों होतों, हें माहित आहे.

आता ओघालाच आलें, म्हणून आणखीहि थोडा खुलासा करून टाकतों. केवळ कै. डॉ. भाऊजी दप्तरी यांनाच नव्हे, तर म. म. प्रि. नानासाहेब मिराशी यांनाहि अध्यक्षपदासाठी विनंती करावयाला श्री. रा. पु. सगदेव आणि मी असे दोघे मुद्दाम गेलों होतों. त्यांनीहि कै. डॉ. दप्तरी यांच्याप्रमाणेंच नकार दिला. कारणेंहि बहुतेक तींच सांगितलीं. म. म. प्रि. मिराशी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यांना गेल्या पांच वर्षांत दोन वेळां अध्यक्षपद स्वीकारण्याबद्दल आम्ही विनंती केलेली आहे.

डॉ. दप्तरी आणि म. म. प्रि. मिराशी यांच्याप्रमाणे आचार्य दादा धर्माधिकारी यांनाहि श्री. पटवर्धन आणि मी अशा दोघांनी १९५० सालीं व श्री. नानासाहेब जोग यांनी १९५३ सालीं अध्यक्षपद स्वीकारण्याबद्दल विनंती केलेली होती. त्यांनीहि नकार दिला. पण कारण मात्र वेगळें सांगितलें. तें असें की, कुठेहि निवडणुकीला उभें राहावयाचें नाही आणि पदाधिकार स्वीकारावयाचा नाही हा त्यांनी घेतलेला निर्णय !

आचार्यांनी मजवर आणि श्री. पटवर्धन यांच्यावर फक्त एकच कृपा केली. ती म्हणजे चांदा येथील संमेलनाचें उद्घाटन करण्याची विनंती मान्य केली, ही होय!

मध्यप्रदेशांतील जुन्या पिढींतल्या नामांकित लेखकांपैकी ज्यांना आम्ही अध्यक्षपद स्वीकारण्याबद्दल विनंती केली. अशीं आणखी दोन प्रमुख नांवें म्हणजे वीर वामनराव जोशी आणि श्री. आ. रा. देशपांडे हे होत. पण या दोघांनीहि नकार दिला. वामनराव दादा तर मला म्हणाले, "अरे, मी एकदा उद्घाटन केलंय ना तुमच्या संमेलनाचं ? आता मला अध्यक्ष व्हायला कसं सांगतां ?"

अगदी शेवटीं बॅ. रामराव देशमुख यांना केलेल्या विनंतीचाहि उल्लेख केला पाहिजे. चांद्याच्या संमेलनाच्या वेळीं उद्घाटनासंबंधी मी प्रथम त्यांना विनंती केली होती. त्यांनीहि नकार दिला. वस्तुत: ते विदर्भ साहित्य संघाचे सदस्य आहेत; व त्याच्या कामकाजाकडे आस्थेनें लक्ष देतात, हें मला प्रत्यक्ष माहित आहे. विदर्भ साहित्य मंदिराच्या लोकमान्य टिळक सभागृहाला टिळक स्मारक निधींतून पांच हजार रुपयांची भरीव देणगी मिळावयास त्यांचेंच सहाय्य आम्हाला मुख्यत: झालें. तरीहि, आपण साहित्यिक नाही, असें सांगून त्यांनी उद्घाटनाचें निमंत्रण नाकारलें.

आपल्याला या गोष्टी माहित नसाव्यात, हें अगदी स्वाभाविक आहे. म्हणून मी आपण 'संपादकीयां'त केलेल्या विधानांबद्दल आपल्याला दोष देत नाही. फक्त विदर्भ साहित्य संघाचे सदस्य आणि 'युगवाणी'चे वाचक यांचा गैरसमज होऊं नये, म्हणून जरूर तेवढाच खुलासा करीत आहें.

आणखी एक गोष्ट. गेल्या सहा वर्षांत मध्यप्रदेशांतील ज्या या ज्येष्ठ साहित्यिकांना आणि विद्वानांना अध्यक्षपदाबद्दल म्हणा किंवा उद्घाटनाबद्दल म्हणा विनंती केल्याचा उल्लेख मी वर केला आहे, त्या सर्व साहित्यिकांना आणि विद्वानांना अशा प्रकारची विनंती करण्यासंबंधी कुलगुरु न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ति, श्री. बाबासाहेब देशपांडे, श्री. ए. श्री. पटवर्धन, श्री. नानासाहेब जोग प्रभृति 'श्रेष्ठीं'ची पूर्ण अनुकूलता होती; व त्यांचा सल्ला आगाऊ घेऊनच आम्ही हे सर्व प्रयत्न केले. ते सफल झाले नाहीत, हा भाग वेगळा !

नागपूर — आपला,

ता० २१।३।५६ — **ग. त्र्यं. माडखोलकर**

१ श्री. ग. त्र्यं. माडखोलकरांचा खुलासा वर जशाचा तसा छापला आहे.

२ आमचा आक्षेप डॉ. भाऊजी दप्तरींना सन्मान्य सभासद का करून घेतलें नाही हा आहे. त्यांना अध्यक्ष का निवडलें नाही, हा नाही.

३ त्यांनी आपणाला साहित्यिक म्हणविलें नाही तरी ते सन्मान्य सभासद होण्याच्या पात्रतेचे साहित्यिक आहेत की नाही हा प्रश्न वादातीत असावा.

४ अध्यक्षपद निवडणुकीने साध्य होतें. तें 'अ' ने 'ब' ला प्रदान करण्याचें किंवा 'ब' ने 'अ' च्या विनंतीने स्वीकारण्याचें पद नव्हे.

५ या ठिकाणीं ओघाला आली म्हणून एक गोष्ट नमूद करावीशी वाटते. श्री. मा. नी. गलगलीकरांना तुम्ही कार्यवाहपद स्वीकारणार असाल तर तुम्हाला आमच्या 'Panel' मध्ये घेऊं म्हणून निरोप आला असतां त्यांनी हा घटनेचा उपमर्द आहे म्हणून निवडणुकींतून आपलें नांव माघारीं घेतलें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

६ श्री. माडखोलकरांनी आपल्या खुलाशांत संपादकीय लेखांतील एक वाक्य प्रारंभींच उद्‌धृत केलें आहे. त्यावरून त्यांनी अखेरीस नामोल्लेख केलेले सारे महाभाग आम्हांला लक्ष्य नव्हते हें उघड आहे. उद्‌धृत वाक्यांतील विशेषण भागाचा अर्थ लावून पाहावा. नामोल्लेख आम्ही मुद्दाम टाळले होते. त्या नामावलीमागची छेकोक्ति स्पष्ट आहे.

७ डॉ. दप्तरींची वर्गणी भरण्याच्या सूचनेंत सौजन्य असलें तरी मानवन माणसाला ती सूचना मान्य झाली नसती.

८ मी साहित्यिक नाही, तेव्हा विदर्भ साहित्य संघांत माझें स्थान नाही, ह्या वाक्यांतील भाऊजींचा उपदेश जर सगळ्यांनी मनावर घेतला तर किती उत्तम होईल !

९ आमच्या बाजूने हा वाद संपला आहे.

सभासदांना व प्रचारकांना सूचना

१. विदर्भ साहित्य संघाचें नवें वर्ष रविवार दि. १ एप्रिल १९९६ पासून सुरू होत आहे.

२. दि. २९ जानेवारी १९९६ रोजीं विशेष साधारण सभेंत मंजूर झालेल्या घटनादुरुस्ती प्रमाणे नवीन सभासदांना आवेदनपत्रें भरून त्यांच्यासह वर्गणी पाठवावी लागेल.

३. जुन्या सभासदांची वर्गणी शनिवार ३१ मार्च १९९६ रोजीं संपते. त्यांनी आपली नवीन वर्षाची सभासदत्वाची वर्गणी त्वरित केंद्रीय कार्यालयाकडे पाठविण्याची कृपा करावी. वर्गणी आल्याखेरीज एप्रिल ९६ नंतरचे युगवाणीचे अंक त्यांच्याकडे पाठविले जाणार नाहीत.

४. सर्व जुनीं पावतीपुस्तकें आता रद्द समजण्यांत येत असल्याने त्यांवर वर्गणी स्वीकारली किंवा दिली जाऊं नये. नवीन पावतीपुस्तकें छापण्यांत येत आहेत. तरी ज्या प्रचारकांकडे जुनीं पावतीपुस्तकें असतील तीं त्यांनी हिशेबासह त्वरित कार्यालयाकडे परत पाठविण्याची कृपा करावी.

दि. १-४-९६
केन्द्रीय कार्यालय,
उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १

श्री. गो. काशीकर,
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

ळ. वि. पांढरीपांडे,
सरचिटणीस, वि. सा. संघ
यांजकडून

केंद्रवृत्त नागपूर,

कार्यकारी मंडळाची सभा

विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा रविवार दि. ११-३-५६ रोजीं सकाळीं ९-३० वाजतां संघाध्यक्ष श्रीमान् बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखालीं केंद्रीय कार्यालयांत भरली.

प्रथम चिटणिसांनी दि. १-२-५६ रोजीं भरलेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेचा अहवाल वाचून दाखविला व तो मंजूर झाला.

नंतर १९५५-५६ सालांतील कार्याचा संक्षिप्त अहवाल आणि फेब्रुवारी १९५६ अखेरचा जमाखर्च चिटणिसांनी कार्यकारी मंडळाला सादर केला व तो मंजूर झाला.

संघशाखा घटना उपसमिति आणि घटनासमिति यांच्या संयुक्त सभेचा अहवाल सभेला सादर करण्यांत आला व तो मंजूर झाला.

रामटेक शाखेने केलेल्या सन्मान्य सभासदांना मान्यता देण्याबाबतचें पत्र सभेला चिटणिसांनी वाचून दाखविलें. त्यावर चर्चा होऊन घटनेच्या नियम ९ ऐ चा मूळ उद्देश पाहतां अशा प्रकारें सभासद करून घेणें, ह्या नियमाच्या मूळ उद्देशांस अनुसरून ठरणार नाही, सबब पत्रांत केलेली विनंती मान्य करतां येत नाही असें सर्वानुमतें ठरलें.

अशोक मुद्रणालयाच्या देणें असलेल्या बिलाबाबत विचारविनिमय होऊन नवीन अध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे व उपाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी हा प्रश्न निकालांत काढावा असें सर्वांनुमतें ठरलें.

तुमसर संमेलनांत मंजूर झालेल्या पुस्तकांच्या यादीविषयक ठरावास आलेलें मध्यप्रदेश सरकारचें उत्तर सादर करण्यांत आलें.

अमरावती शाखेतर्फे प्रा. व्यवहारे यांनी विशेष मागणी केल्यावरून त्या शाखेला रु. २५ चें जादा अनुदान सर्वानुमतें मंजूर झालें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शेवटीं प्रा. पां. कृ. सावळापूरकर यांनी अध्यक्षांच्या आभाराचा ठराव मांडला व तो मंजूर होऊन संघाध्यक्ष श्रीमान बाबासाहेब खापर्डे यांचा पुष्पहार समर्पण करून सत्कार करण्यांत आला.

अध्यक्षांनी सत्कारास उत्तर दिल्यावर ही सभा संपली.

नवीन कार्यकारी मंडळाची सभा

घटना नियम १४ अ प्रमाणे १९५६–५७ ते १९५८–५९ सालासाठी कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी निवडण्यासाठी संघाध्यक्ष श्रीमान बाबासाहेब खापर्डे यांनी दि. ११–३–५६ रोजीं सकाळीं १०–३० वाजतां नवीन कार्यकारी मंडळाची बोलावलेली सभा नवे संघाध्यक्ष श्री बाळासाहेब ढवळे यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय कार्यालयांत भरली.

प्रथम नवीन संघाध्यक्षांनी जुने अध्यक्ष व कार्यकारी मंडळ यांचे आभार मानले व घटना नि. १३ प्रमाणे श्री. ना. रा. शेंडे आणि कु. ताराबाई प्रधान यांची सभासद म्हणून नवीन कार्यकारी मंडळावर नियुक्ति दि. १–३–५६ रोजीं केली असल्याचें सांगितलें.

त्यानंतर पुढील पदाधिकारी घटना नियम ११ आ अनुसार एकमताने निवडण्यांत आले—

उपाध्यक्ष—श्री. ना. रा. शेंडे.
सरचिटणीस—श्री. श्री. गो. काशीकर.
चिटणीस—(१) श्री. य. गो. माळोदे
(२) श्री. चं. प. भिशीकर
(३) श्री. तु. वि. गेडाम
कोषाध्यक्ष—कु. ताराबाई प्रधान
संपादक, "युगवाणी"—प्रा. पां. कृ. सावळापूरकर
संचालक, "परीक्षा समिति"—प्रा. माणिक के. बैतुले

अध्यक्षांनी सभासदांचे आभार मानल्यावर ही सभा संपली.

* *

सांस्कृतिक कार्यक्रम

श्री. नानासाहेब कुंटे यांची भेट

रविवार दि. ४ मार्च १९५६ रोजीं सकाळीं ८–३० वाजतां मुंबई राज्य विधानसभेचे सभापति माननीय श्री. डी. के. उर्फ नानासाहेब कुंटे यांनी विदर्भ साहित्य मंदिराला भेट दिली. सांस्कृतिक कार्यक्रम समितीतर्फे त्यांचें स्वागत करण्यांत आलें. श्री. नानासाहेब कुंटे यांनी साहित्यासंबंधी कळकळीचें भाषण केलें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वार्षिक व्याख्यानमाला

सांस्कृतिक कार्यक्रम समितीतर्फे यंदा ह. भ. प. प्रा. शं. वा. उर्फ सोनोपंत दांडेकर यांचीं प्रमुख मराठी संतांवर व्याख्यानमाला आयोजित करण्यांत आली.

दि. १७, १८, १९ व २०-३-५६ ह्या चार दिवशीं रोज सायंकाळीं अनुक्रमें ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास व तुकाराम ह्या चार थोर संतांच्या प्राचीन संतवाङ्मयावर आचार्य दांडेकर यांचीं मोठीं उद्बोधक व्याख्यानें झालीं. शेवटच्या व्याख्यानाच्या दिवशीं रात्रीं ९-१० वा. त्यांचें श्रवणीय कीर्तनहि झालें.

* *

नाट्य समिति

आग्र्याहून सुटका

बुधवार दि. ७-३-५६ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां श्री. दि. ब. पंडित यांचें " आग्र्याहून सुटका " या नाटकावर व्याख्यान झालें.

* *

शाखा वृत्त

अमरावती शाखा : वार्षिक अहवाल

दि. २९-८-५५ रोजीं शाखेकडे रीतसर अधिकार प्रा. व्यवहारे यांनी दिले. यानंतर कार्यकारिणीच्या आठ मासिक सभा झाल्या.

दिनांक २७-८-५३ रोजीं कै. खाडिलकर स्मृतिदिन आणि केळकर स्मृतिदिन- दि. १९ ऑक्टोबर ५६ रोजीं साजरे झाले.

प्रा. ग. त्र्यं. देशपांडे यांचीं 'साहित्यांतील रसविचार' या विषयावर दिनांक १७ ते २० ऑक्टोबरपर्यंत व्याख्यानें झालींत.

सांस्कृतिक समितीतर्फे कोजागिरी उत्सवानिमित्त स्थानिक कवींचे संम्मेलन भरविण्यांत येऊन त्यांत काव्यगायनाचा कार्यक्रम झाला.

अमरावती येथे परीक्षाकेंद्रांत पहिल्या सत्रांत एकूण २८६ विद्यार्थी बसले व निकाल ७१·७ शेकडा लागला

दि. २ व ३ मार्च रोजीं जळगांव येथील प्रा. म. ना. अदवंत यांचे अध्यक्षतेखाली वार्षिकोत्सव साजरा करण्यांत आला. संमेलनाचें उद्घाटन म. म. मिराशी यांनी केलें. पुण्यप्रभाव या नाटकाचें नाट्यवाचन करण्यांत आले.

दुसरे दिवशीं 'भाषा-भगिनींतील नाट्यविकास' या विषयावर परिसंवाद झाला.

रात्रौ ९॥ वाजतां शास्त्रीय गायन झालें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाच्या दि. २०-२-१९५६ रोजीं झालेल्या निवडणुकी

दि. २०–२–१९५६ रोजीं विदर्भ साहित्य संघाच्या अध्यक्ष-पदाकरिता तसेंच कार्यकारी मंडळाच्या सभासदत्वाकरिता झालेल्या निवडणुकींबाबत रा. शंकर नारायण सहस्रबुद्धे यांनी लवादाकडे तक्रारअर्ज दाखल केला. त्या अर्जाची प्राथमिक सुनावणी दि. ७–४–५६ ला संघाच्या केंद्रीय कार्यालयांत रात्रौ ८ पासून सुरू होणार आहे. त्याची नोटीस अर्जदार व निवडणुकींना उभे राहिलेल्या सर्वहि उमेदवारांना वेगळी पाठविण्यांत आलीच आहे.

(सही) खं. के. रांगोळे
२९–३–५६
निवडणूक लवाद

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ

वार्षिक साधारण सभेची सूचना

घटना नियम १० अ प्रमाणे विदर्भ साहित्य संघाची वार्षिक साधारण सभा रविवार दिनांक १९-४-१९५६ रोजीं सकाळीं ८ वाजतां केन्द्रीय कार्यालयांत भरेल.

सभेपुढील विषय

१. मागील सभेचा अहवाल
२. गतवर्षीचें कार्यवृत्त
३. गतवर्षीचे हिशेब व पुढील वर्षासाठी अंदाजपत्रक.
४. अधिकृत हिशेब तपासनीसांची नेमणूक.
५. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय.

विशेष सूचना—(१) ही सभा गणपूर्तीच्या अभावीं स्थगित झाल्यास तीच सभा, त्याच दिवशीं, त्याच जागीं सकाळीं ८-३० वाजतां भरेल.

(२) गतवर्षीचे हिशेबतपासनीसांनी तपासलेले हिशेब व येत्या वर्षासाठी अंदाजपत्रक हीं सभेच्या तारखेपूर्वी ८ दिवस केंद्रीय कार्यालयांत सूचनाफलकावर लावण्यांत येतील.

दिनांक २ एप्रिल १९५६
केन्द्रीय कार्यालय,
उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर-१

श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे उद्देश आणि गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराची इमारत पूर्ण करणें व नाट्यगृह बांधणें.

२. वि सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र युगवाणी आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीने दुर्मिळ ऐतिहासिक, शैक्षणिक व वाङ्मयीन ग्रंथांचें प्रकाशन

५. मराठी भाषेच्या हिताचें प्रातिनिधिक स्वरूपाचें कार्य करणें.

मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनाने विदर्भ साहित्य संघाला मदत करावी अशी नम्र विनंती आहे.

'युगवाणी' सदस्यांना विनामूल्य. * सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

हें मासिक श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांनी वि. सा. संघाकरितां नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १ येथे मुद्रित करून संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ